# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १३ जुलै, २०१८ / आषाढ २२, १९४० (शके)**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी व फलोत्पादन मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६५**

---

### माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१) * ४१९६६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४०३४७ ला दिनांक ८ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी हा नव्याने होत असून माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील २२ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी या महामार्गाकरीता संपादित होत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील बाधित शेतकऱ्यांनी संघर्ष समिती स्थापन करुन महामार्गाचे काम बंद पाडून त्यांनी आपली समस्या शासनाकडे मांडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

माळशिरस तालुक्यातील १४ गावांमध्ये सदर राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील वळण सुधारणासाठी भूसंपादन करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सातारा-लातूर रा.म.क्र. ५४८ सी राष्ट्रीय महामार्ग केंद्र शासनाच्या दिनांक ०३/०१/२०१७ च्या अधिसूचनेव्दारे घोषित झालेला असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.

सद्य:स्थितीत राज्यमार्ग क्र. १४१ ची रुंदी २४ मीटर आहे. या रुंदीतच व प्रत्यक्ष असलेल्या वहिवाटीच्या रुंदीतच दोन पदरी व पेव्हड शोल्डरचे काम प्रगतीत आहे. भौमितिक, वळण सुधारणा, बसबे, विश्रांती थांबा तसेच पथकर नाका इ. करीता तेथे वहिवाटीचा रुंदीपेक्षा जास्त रुंदीची आवश्यकता असून अशा ठिकाणी भूसंपादन करण्यात येणार असून ३ (A) ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर रस्ता सुधारणेचे काम करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर येथे भूखंड वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(२) * ४२१९१ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खालापूर येथील फूड मॉल, ट्रक टर्मिनलसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केलेल्या भूखंड वाटपात अनेक प्रकारच्या अनियमितता झाल्याने शासनाचे रूपये २००० कोटींचे नुकसान झाल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून या अनियमितते संदर्भात चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सहा भूखंडाच्या शेजारी असलेला मौजे सारसन व मौजे ठाणे न्हावे येथील भूखंडाची (हेक्टर क्षेत्र ९.५०) घाईघाईने निविदा प्रक्रिया करुन हे भूखंड ३० वर्षे कालावधीसाठी रुपये १० कोटी ४१ लाख इतक्या कमी भावाने ट्रक टर्मिनल, फूडवेसाठी देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूखंड वाटपाच्या अनियमितते प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता सहव्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०२/२०१७ रोजी चौकशी समिती नेमण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, ट्रक टर्मिनल २ च्या भूखंडासाठी ९.५० हेक्टर क्षेत्राकरीता ३० वर्षाच्या भाडेपट्टयासाठी रुपये १५.५६५ कोटी महामंडळास प्राप्त झाले असून रुपये ४०.०० कोटी रुपयांचे ट्रक टर्मिनलचे बांधकाम सवलत धारकाने करावयाचे असून तयार झालेल्या सुविधेतून महामंडळास पार्किंग चार्जेस पोटी ५०% वाटा मिळणार आहे व ट्रक चालकांसाठी सुविधा सुध्दा मिळणार आहेत.

(३) यासंदर्भात चौकशी समितीचा अहवाल महामंडळास प्राप्त झाला असून समितीचा अहवाल संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांची नोंदणी मर्यादा वाढविण्याबाबत

**(३) * ४१५१२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७२,००० नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंते असून १०,००० सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मागील १० वर्षात एकही काम न मिळाल्याने त्यांना ठेकेदारीचे नोंदणीचे नुतनीकरण करण्यास अडचणी येत असून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना (वर्ग-५) रुपये ५० लक्ष ऐवजी (वर्ग-४) रुपये १ कोटी ५० लक्ष मध्ये नोंदणी देण्याची कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, एकापेक्षा जास्त अभियंते एकत्र येवून संयुक्त भागीदारी करुन त्यांना किमान रुपये ५ कोटी किंमतीच्या स्पर्धात्मक निविदेसाठी मान्यता मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना जास्त कामे मिळावीत यासाठी त्यांची नोंदणी मर्यादा रुपये ५० लक्ष वरुन रुपये १.५० कोटी एवढी वाढविण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) सु.बे.अ. यांना रुपये १.५० कोटी रकमेपर्यंतची कामे देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३१/५/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) बायपास या राष्ट्रीय महामार्गावर अपघातप्रवण क्षेत्र निर्माण करण्याबाबत

**(४) * ४१३२१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) बायपास या राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी अपघातप्रवण क्षेत्रे निर्माण झाली असल्याने याबाबत वाहनचालकांनी संबंधित ठेकेदार व बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रारी करुनही संबंधित विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुलर्क्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील आसोले-नगर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५) * ४२२०२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) येथील आसोले-नगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंटीकरणाचे काम सुरु असून अल्पावधीतच या सिमेंट रस्त्याला ठिकठिकाणी तडा गेल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सिमेंटीकरण केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंता यांच्याकडे तक्रारी करुनही संबंधित शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांचे आर्थिक संगनमत असल्याने दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी/कर्मचारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे,

सदर रस्त्यावर आमदार निधी अंतर्गत सन २०११-१२ मध्ये ६.०० लक्ष रुपयाचे सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आलेले होते. सदर सिमेंट रस्ता काळ्या मातीतून जात असल्याने व दोन्ही बाजूला पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्याला काही ठिकाणी तडा गेल्याचे आढळून येते. परंतु सदर कामाचा दोष दायित्व कालावधी संपलेला असून सद्या सदर रस्ता दुरुस्ती व देखभालीकरीता नगरपरिषद आर्वी यांच्याकडे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) या प्रकरणी दक्षता गुणनियंत्रण मंडळास पाहणी करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

-----------------

## मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या सीमा निश्चित करण्याबाबत

**(६) * ४१३७९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३२२२३ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या सीमा निश्चित करणे व त्यांचा विकास तसेच आदिवासी पाड्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली तयार करण्यात येणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत कोळीवाडे व गावठाणे यांची संख्या किती आहे त्यांची नोंद घेतलेली आहे काय, तसेच त्यांचे सीमांकन निश्चित केले आहे काय, सदर बाबतीत विकास नियंत्रण नियमावली शासनाकडून तयार करण्यात आली आहे काय, तसेच किती कालावधीमध्ये याबाबतची कार्यवाही पूर्ण होणार आहे,

(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांचे गोरेगावच्या आरे वसाहतीत पुनर्वसन करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मुंबईतील कोळीवाड्यांच्या सीमा निश्चित करण्याबाबत कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली असून शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना दिनांक ०८/०५/२०१८ व्दारे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली २०३४ शासनाने मंजूर केली असून सदर नियमावलीतील विनियम ३३(१६) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा क्षेत्राच्या पुनर्विकासासंबंधी तरतुद करण्यात आलेली आहे.

(२) सहाय्यक आयुक्त, मत्सव्यवसाय, मुंबई शहर/मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसार मुंबई शहर जिल्ह्यामध्ये १२ व मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये २९ कोळीवाड्यांची नोंद आहे. या कोळीवाड्यांच्या सीमांची गावठाणाप्रमाणे भूमि अभिलेख दप्तरी नोंद नाही. सदरहू कोळीवाड्यांच्या सीमा दप्तरी नोंद घेण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही अनुसरावी लागणार असल्याने बृहन्मुंबईतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सीमांकन करण्यासाठी अनुसरावी लागणारी कार्यपध्दती व तत्संबंधीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०/११/२०१२ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने सन २०१५ ते २०१७ दरम्यान जागेवर जाऊन काही कोळीवाड्यांची प्रत्यक्ष पहाणी करुन स्थळ पहाणीचा अहवाल दिनांक ०२/०५/२०१६ व दिनांक ०१/०१/२०१८ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व पात्र अतिक्रमणदारांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य वन संरक्षक आणि संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, मुंबई यांनी शासनास सादर केला असून पुनर्वसनाचा प्रस्ताव पुढील उचित कार्यवाही करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला अग्रेषित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील टोलनाक्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पिवळया पट्टीबाबत निर्णय घेण्याबाबत

**(७) * ४१७३८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६३६ ला दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोलनाक्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच पिवळ्या पट्टीबाबत निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये एक तज्ञांची समितीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय, सदरहू समितीच्या शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेतला आहे आणि किती कालावधीत अहवाल प्राप्त होणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
समितीची स्थापना दिनांक ०६/०४/२०१८ रोजी करण्यात आले आहे.
(२) समितीची प्राथमिक बैठक दिनांक २५/०४/२०१८ रोजी झाली आहे. बैठकीमध्ये आयआयटी, मुंबई यांचे तज्ञ व्यापक अभ्यास करुन ६ महिन्यामध्ये अहवाल सादर करतील व तद्नंतर निविदेतील तरतुदीस अधिन राहून, कायदेतज्ञ आपले अभिप्राय देतील, असा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुष्काळग्रस्त भागात जुन्या निकषांप्रमाणे मदत देण्याबाबत

**(८) * ४२४५७ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ४० टक्के भागात दुष्काळी स्थिती निर्माण झालेली असून जनतेवर मोठी आपत्ती ओढवलेली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी राज्यातील ३ जिल्ह्यातील ८ तालुक्यात मध्यम स्वरुपाचा दुष्काळ दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जाहीर केला आहे, तसेच इतर तालुक्यांमध्ये देखील दुष्काळ जाहीर केलेल्या ८ तालुक्यांप्रमाणेच स्थिती असताना या तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने सुधारित दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मध्ये विहित केलेल्या निकषांचा फेरविचार करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली विनंती मान्य होईपर्यंत जुन्या निकषांप्रमाणे गंभीर परिस्थिती असलेल्या राज्यातील इतर तालुक्यांमध्येही दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात दुष्काळग्रस्त भागात जुन्या निकषांप्रमाणे दुष्काळ जाहीर करुन मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील कार्यपध्दती व शास्त्रीय निकषानुसार राज्यातील यवतमाळ, वाशीम, जळगांव या तीन जिल्ह्यातील एकुण ८ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याने तेथे महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २५ एप्रिल, २०१८ अन्वये रब्बी हंगाम सन २०१७-१८ मध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व मदत जाहीर करण्यात आली आहे.

(३) व (४) केंद्र शासनाने दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील दुष्काळ घोषित करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या निकषाबाबत विविध राज्यांनी व्यक्त केलेली मते विचारात

घेवून सदर संहितेमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा राज्य शासनास कळविल्या आहेत. त्यानुसार महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २८ जून, २०१८ अन्वये दुष्काळ घोषित करण्याच्या निकषामध्ये व कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लहरी हवामान व कर्जबाजारीपणामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(९) * ४१८१३ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लहरी हवामान व कर्जबाजारीपणामुळे गेल्या तीन महिन्यात २२१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हानिहाय किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना/कुटुंबियांना शासनाने आतापर्यंत किती मदत केली आहे
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राज्यात १ मार्च, २०१८ ते ३१ मे, २०१८ या कालावधीत एकूण ६३९ आत्महत्यांची प्रकरणी आढळून आली. त्यातील १८८ प्रकरणे दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील नापिकी,

कर्जबाजारीपणा आणि कर्ज परतफेडीचा तगादा या तीन निकषानुसार जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र ठरविण्यात आली. तसेच १२२ प्रकरणे निकषात बसत नसल्याने अपात्र ठरविण्यात आली आहेत. ३२९ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित असून १८८ पात्र प्रकरणांपैकी १७४ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तलाठी कार्यालये एजंटमुक्त करण्याबाबत

**(१०) * ४२०६६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात तलाठी कार्यालयात एजंट मोठ्या प्रमाणात वावर असून तलाठी कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिक/विद्यार्थ्यांकडून भरमसाठ पैसे आकारुन आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलाठी कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संगनमताने अशा एजंटची दुकानदारी चालत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तलाठी कार्यालय एजंटमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) * ४१८६८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण काजू उत्पादनापैकी ५० टक्के काजू उत्पादन कोकणात होते, रत्नागिरी जिल्ह्यात ९२ हजार ४५५ हेक्टर क्षेत्रावर काजूची लागवड असून ९० हजार ते १ लाख टन काजूचे उत्पादन होते, काजू बियांना मागणी असल्यामुळे त्याकरीता प्रक्रिया केंद्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध असताना देखील त्या वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काजूच्या बोंडापासून वाईन, सरबत अथवा जॅम असे पदार्थ बनविण्याकरीता प्रकल्प कोकणात यावेत, याकरीता शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, वातावरणातील अनियमिततेमुळे काजू बागायतदारांना होणाऱ्या नुकसानाची भरपाई मिळण्याच्यादृष्टीने आर्थिक तरतूद करणार आहे काय, गतवर्षीच्या अर्थसंकल्पात रुपये ५० कोटींचा निधीची तरतूद काजू बोंड प्रक्रिया प्रकल्पासाठी करण्यात आली होते, परंतु शासनाने किती प्रकल्प उभे केले आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात काजू लागवडीखालील एकूण ९७०४२ हेक्टर क्षेत्र आहे. जिल्ह्यामध्ये काजू बोंडाचे सुमारे २६२०१४ टन तर काजू बियांचे १३१००७ मे.टन होते. एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमांतर्गत प्रक्रिया केंद्राच्या उभारणीसाठी कमाल रुपये २५.०० लाख प्रकल्प खर्चासाठी अनुदान देण्यात येते, मात्र या घटकांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यामध्ये काजू बोंडावरील प्रक्रियेसाठी काजू बागायतदार गुंतवणूक करण्यास उत्सुक नाहीत. त्यामुळे पुरेशा प्रक्रिया केंद्राअभावी काही प्रमाणात काजू बोंडाचे नुकसान होते.

(२) राज्यात मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना लागू करण्यात आली असून या योजनेंतर्गत कोकणातील उद्योजकांनी काजू बोंडावरील प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केल्यास त्याला योजनेच्या निकषाप्रमाणे अनुदान देणे शक्य आहे.

(३) पुनर्रचित हवामान आधारित फळपीक योजनेंतर्गत वातावरणातील अनियमिततेमुळे काजू पिकावरील योजनेच्या निकषानुसार नुकसान भरपाईची तरतूद करण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ मध्ये मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत रुपये ५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. तथापि, सदर तरतूद ही केवळ काजू बोंडाच्या प्रक्रिया प्रकल्पासाठी नव्हती तर सर्व प्रकारच्या कृषी व अन्न प्रक्रिया प्रकल्पासाठी करण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत काजू बोंडाच्या प्रक्रिया प्रकल्पासाठी रत्नागिरी जिल्ह्यातून प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. तथापि, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून १० प्रस्ताव आयुक्त (कृषी) यांचेस्तरावर प्राप्त झाले. त्यापैकी ३ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून ७ प्रस्ताव त्रूटीच्या पूर्ततेकरीता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेकडे परत पाठविण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील कोळी महिलांना मासे विक्रीचे परवाने देण्याबाबत

**(१२) * ४१८९७ श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील कोळी महिलांनी उदरनिर्वाहासाठी कायमस्वरुपी मासे विक्री परवाने मिळण्याबाबत मा.मत्स्यविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मासे विक्रीसाठी परवाने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.

(२) मुंबई, मालाड व दहिसर मासळी मार्केटमध्ये मासे विक्रीसाठी देण्यात येणारे परवाने हे स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत देण्यात येतात. मासे विक्रीसाठी देण्यात येणारे परवाने हे मत्स्यव्यवसाय विभागामार्फत दिले जात नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर-दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्याला जोडणाऱ्या पराचुरी-उनवरे-फरारे पुलाच्या कामाबाबत

**(१३) * ४२४६९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामस्थांना मुंबईत येण्यासाठी सुमारे ३५० कि.मी. अंतराचा प्रवास करावा लागत असल्याने गुहागर-दापोली या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या पराचुरी-उनवरे-फरारे असा खाडीवर पूल बांधून महामार्ग तयार करून मुंबई-गोवा महामार्गाला जोडण्यात यावा अशी मागणी सदरहू तालुक्यातील जनतेने मागील ५ वर्षांपासून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावर यापूर्वी सर्वेक्षणही झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीनुसार पूल उभारण्यात आल्यास ३५० कि.मी.चे अंतर १०० कि.मी.ने कमी होऊन प्रवाशांनाही प्रवासाच्या आर्थिक खर्चापासून दिलासा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुहागर-दापोली तालुक्याला जोडणाऱ्या पराचुरी-उनवरे-फरारे पुलाच्या व मुंबई-गोवा महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यांच्या कामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सन १९९५ मध्ये मागणी करण्यात आली आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदरचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

-----------------

## पिंपळनेर (जि.बीड) गावास तालुक्याचा दर्जा देण्याबाबत

**(१४) * ४१७२२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळनेर (जि.बीड) या गावास तालुक्याचा दर्जा मिळावा म्हणून पिंपळनेर परिसरातील ग्रामस्थांनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे धरणे आंदोलन तसेच त्यानंतर दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी रस्ता रोको आंदोलन करून तालुका निर्मितीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड तालुक्यात १७८ ग्रामपंचायती आणि २३४ मौजे असल्याने या मोठ्या तालुक्याचे विभाजन करून पिंपळनेर या नवीन तालुक्याची निर्मितीची मागणी विविध सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधीकडून सन १९६२ पासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भौगोलिक, सामाजिक दृष्टीकोन आणि अस्तित्वातील शासकीय कार्यालये इ. बाबी विचारात घेऊन नवीन पिंपळनेर तालुक्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या

अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करुन तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) * ४२५४१ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसे प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या दवडीपार (बेला) येथील आंशिक पुनर्वसन संदर्भात प्रकल्प बाधित ९८ घराचे पुनर्वसन करण्याबाबत दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी जिल्हा बैठक आढावा सभेत सदर विभागाला निर्देश देण्यात आले असून सदर ९८ घरांचे पुनर्वसन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील गोसेखुर्द आवरमारा गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण करण्यासंबधीत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने शासनास आदेश दिल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २३/४/२०१८ रोजी निवेदन दिले आहे.

दिनांक २७/४/२०१८ रोजी विभागीय आयुक्त, नागपूर येथे झालेल्या बैठकीत मा.पालकमंत्री यांनी दवडीपार गावठाणाचे फेरसर्व्हेक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) जनहिन याचिका क्र. ६१/२०१८ मध्ये दिनांक २/५/२०१८ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये शासनास पुनर्वसन विषयक कार्यवाही चालू ठेवण्याची मुभा दिली आहे.

(३) दवडीपार (बेला) ता.भंडारा या गावाचे सर्व्हेक्षण जलसंपदा विभागाने केले असून सदर गावठाण बाधित होत नसल्याचे दिसून आले आहे.

नागपूर जिल्ह्यातील मौजा-आवरमारा या गावातील सुमारे १८% जमीन संपादित केली आहे. मौजा आवरमारा गावठाण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत नाही. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र. ६१/२०१८ दाखल असून मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमर महल, चेंबुर (मुंबई) येथील शासकीय कार्यालयाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) * ४१३८६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमर महल, चेंबुर (मुंबई) येथे शासनाच्या विविध विभागांची कार्यालये असून सदर कार्यालयाच्या इमारती जीर्ण झाल्याने इमारतीची दुरवस्था होवून जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) चेंबूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवारातील दोन्ही प्रशासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे केली जाते. या दोन इमारतींपैकी एका इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदरची इमारत सुस्थितीत आहे. दुसरी प्रशासकीय इमारतही सुस्थितीत असून या इमारतीच्या संरचनात्मक बाबींची तपासणी करुन आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नेवाळी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) परिसरातील शासकीय विकासकामे व नागरिकांच्या घर दुरुस्तीस परवानगी देण्याबाबत

**(१७) * ४१७९१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवाळी (ता.अंबरनाथ) परिसरातील चिंचवली गावात ठाणे जिल्हा बांधकाम विभागाकडून सुरु असलेली विकासकामे तसेच या परिसरातील नागरिकांच्या जुन्या घरांची पावसाळ्यापूर्वीची दुरुस्तीची कामे नौदल अधिकाऱ्यांनी माहे एप्रिल, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात बंद पाडली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी नौदल अधिकारी व स्थानिक नागरिकामध्ये रस्त्यांची कामे व घर दुरुस्तीला होत असलेल्या विरोधावरून झालेला वाद पोलिसांच्या मध्यस्तीने टळला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरात यापूर्वी दिनांक २२ जून, २०१७ रोजी झालेल्या संघर्षमय आंदोलनानंतर याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) मौ.चिंचवली, ता.अंबरनाथ येथील रस्त्याच्या कामास घेतलेल्या आक्षेपावरून झालेला वाद पोलिसांनी व ग्रामसेवक चिंचवली यांनी नौदलाच्या संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर बाबी पटवून देऊन संपुष्टात आणला आहे.

(३) दिनांक २२/०६/२०१७ रोजी झालेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने राज्य विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात झालेल्या चर्चेस अनुसरून याबाबत आवश्यक तो निर्णय घेण्यासाठी बैठक आयोजित करण्याची विनंती संरक्षण मंत्रालयास दिनांक १४/०८/२०१७ व दिनांक १७/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोर (जि.पालघर) येथील दुर्वेस गावातील शेत जमिनीमध्ये अतिक्रमण केल्याबाबत

**(१८) * ४१७९५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथील दुर्वेस गावातील आदिवासींच्या नावे असणाऱ्या नवीन शेतजमिनीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराला ग्रामपंचायतीने नोटीस देऊनही त्याची ठेकेदाराने कोणतीही दखल घेतली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे दुर्वेस (ता.जि.पालघर) येथील स.नं १३०/२ क्षेत्र १-०१.० हे-आर. या नविन अविभाज्य शर्तीच्या श्री.चंदू लक्ष्मण पडोसा व इतर यांच्या शेत जमिनीमध्ये श्री.राकेश राजकरण मिश्रा या ठेकेदाराने अतिक्रमण करुन बांधकाम केले असून सदर अनधिकृत बांधकामधारकास ग्रामपंचायत दुर्वेस-साये यांनी दिनांक २९/१२/२०१७ व दिनांक २०/०२/२०१८ अन्वये नोटीसा बजावल्या आहेत. तसेच सदरची जमीन नविन अविभाज्य शर्तीची असल्याने व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ व ३६अ ला अधीन असल्याने तहसिलदार, पालघर यांच्याकडून उक्त अनधिकृत बांधकामधारकांना कलम ३६अ नमुना ब अन्वये नोटीस बजावण्यात आली असून तहसिलदार, पालघर यांचेस्तरावर याबाबतची सुनावणी सुरु आहे.

-----------------

## टाकळी (ता.दौंड, जि.पुणे) येथील अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(१९) * ४२४४८ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी (ता.दौंड, जि.पुणे) येथील भीमा नदीपात्रात बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर तसेच त्यांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नाधीन भागात माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावळेश्वर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत

**(२०) * ४२२२२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री यांनी दत्तक घेतलेल्या सावळेश्वर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या गावातील माधवराव रावते शेतकऱ्याचे नापिकी व बोंडअळीमुळे नुकसान भरपाई मिळण्याच्या/कर्जमाफीच्या यादीत नाव असतानाही नुकसान भरपाई न मिळाल्याने स्वत:च्या शेतात सरण रचून आत्महत्या केल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोथबोडण (जि.यवतमाळ) गावात २३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून उक्त गावातील सुंदरीबाई चव्हाण या विधवा महिलेने नांगरणीसाठी पैसे नसल्याकारणाने स्वतःला जाळून घेतले तसेच, राजूरवाडी (ता.घाटंजी) येथील शंकर चायरे शेतकऱ्यांने आत्महत्या करताना माझ्या आत्महत्येला पंतप्रधान जबाबदार राहतील अशी चिठ्ठी लिहून आत्महत्या केली असल्याची बाब माहे एप्रिल-मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावळेश्वर (ता.उमरखेड) येथील शेतकरी आत्महत्या प्रकरणी बिटरगाव पोलिसांनी पंचनामा करुन सदर प्रकरणाची आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शंकर चायरे यांच्या आत्महत्येप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुन घेतली नसल्यामुळे पिडित कुटुंबानेही पंतप्रधानांना पत्र पाठवून निषेध व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांचे मदत वाटपाच्या/कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही मदत न देणाऱ्या बेजबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर

कारवाई करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांस मदत देण्याबाबत तसेच, शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

मृतक माधवराव रावते हे दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी दु.१२.३० च्या दरम्यान त्यांचे शेतात पऱ्हाटीच्या ढिगाऱ्यावर सावलीत बसून असताना बिडी पेटविताना विस्तवाची ठिणगी त्या पऱ्हाटीच्या ढिगाऱ्यावर पडल्याने ढिगाऱ्याला आग लागली व ते वयोवृध्द असल्याने त्यांचा तोल जाऊन आगीत पडले व आकस्मिकपणे जळून मरण पावले.

मृतकास दिनांक २९/११/२०१७ ला कर्ज माफी देण्यात आलेली आहे.

यवतमाळ जिल्ह्याकरीता बोंडअळीमुळे झालेल्या नुकसान भरपाई वाटपाकरीता पहिला टप्पा रुपये ९३,११,०००,०० एवढे अनुदान देण्यात आले असून १६ तालुक्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी तहसिलदार, उमरखेड यांना रुपये ४,१९,५७,४६३ एवढे अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. मृतकाचे नाव बोंडअळीमुळे झालेल्या नुकसान यादीमध्ये समाविष्ट असून A,B,C,D वर्णानुक्रमे मृतकाच्या गावाचे नाव यादीत येताच त्यांचे कुटुंबास अनुदान वाटप करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

मौजे बोथबोडण, ता.जि.यवतमाळ या गावात २३ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असून सदर गावातील सुंदरीबाई चव्हाण या विधवा महिला त्यांचे मुलाकडे आली असता दिनांक ०२/०५/२०१८ रोजी त्या झोपेतून उठल्यावर केरोसीनचा दिवा अंगावर पडल्यामुळे जळाल्याने उपचारादरम्यान दिनांक ०६/०५/२०१८ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

मौजे राजूरवाडी, ता.घाटंजी येथील शंकर चायरे या शेतकऱ्याने दिनांक १०/०४/२०१८ रोजी विष प्राशन करुन फाशी घेण्याचा प्रयत्न करीत असता दोर तुटल्याने खाली पडला. त्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आले असता वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. घटनास्थळी पंचनामा केला असता त्याठिकाणी तुटलेली दोरी व मोनोसील विषारी औषधाचा डबा आढळला. त्याच दिवशी रात्री २१.३० च्या

दरम्यान मृतकाची मुलगी कु.जयश्री चायरे हिने पोलीस स्टेशन घाटंजी येथे येऊन त्यांचे वडीलांनी कापूस न झाल्याने व बोंडअळीमुळे कर्जबाजारी असल्याबाबतची व त्यांचे मृत्यूस नरेंद्र मोदी सरकार जबाबदार राहील असे लिहून ठेवलेली चिठ्ठी हजर केली.

(३) होय.

(४) मृतकाची मुलगी कु.जयश्री चायरे हिने पोलीस स्टेशन घाटंजी येथे दिलेली चिठ्ठी जप्त करण्यात आली असून सदर चिठ्ठी हस्ताक्षर तपासणीकरीता तज्ञांकडे पाठविण्यात आली असून अहवाल अप्राप्त आहे. कु.जयश्री चायरे यांनी दिलेल्या तक्रारीची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेण्यात आली आहे.

(५) शेतकऱ्यांना बोंडअळीमुळे झालेल्या कापसाची नुकसान भरपाई वाटपाकरीता टप्प्या-टप्प्याने अनुदान वितरीत करण्यात येत आहे. अनुदान वाटपाचे निकष इंग्रजी वर्णमालेनुसार असल्याने सावळेश्वर, ता.उमरखेड व राजूरवाडी, ता.घाटंजी या गावाचे नाव अनुदान वाटपामध्ये येताच मृतकाचे कुटुंबास अनुदान वाटप करण्यात येईल.

शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये जिल्हा समितीने मृतक शंकर चायरे शेतकरी आत्महत्या प्रकरण पात्र केले असून मृतकाचे कुटुंबास रुपये १.०० लक्ष प्रमाणे मदत देण्यात आलेली आहे. मृत माधवराव रावते, रा.सावळेश्वर, ता.उमरखेड व मृतक सुंदरीबाई चव्हाण, बोथबोडण, ता.जि.यवतमाळ यांची आत्महत्या प्रकरणे शेती विषयक कारणाने झालेली नसल्याने प्रकरण अपात्र ठरविण्यात आली आहेत.

यवतमाळ जिल्हयामध्ये शेतकरी आत्महत्या रोखण्याकरीता बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येते. त्या अंतर्गत शेतकऱ्यांना पेरणीसाठी मदत, आजारांकरीता मदत, हात उसनवारी, मृत जनावरांसाठी मदत, शेतकऱ्यांच्या पाल्यांना स्पर्धा परिक्षेसाठी मदत तसेच उच्च शिक्षण (MBBS) प्रथम वर्षासाठी मदत, फवारणी बाधित व्यक्तींना मदत, फवारणी किटचे वाटप, प्रबोधनाचे कार्यक्रम व कृषी मेळाव्याचे आयोजन, शेतकऱ्यांसाठी अर्ज द्या कर्ज घ्या ही मोहीम राबविण्यात येत आहे.

-----------------

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२१) * ४२०५८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील पुगाव हद्दीतून नम्रता ढाबा ते कांदले हा १९ गावांना जोडणाऱ्या रहदारीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने सदर रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच मार्गावरील ऐनवहाल पुल गेल्या वर्षापासून जीर्ण व दुरवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्ता व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. सदर रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग क्षतिग्रस्त झाला आहे.
(२) खरे आहे.
(३) व (४) प्रश्नांकीत रस्त्याच्या एकूण २३.४०० कि.मी. लांबीपैकी क्षतीग्रस्त लांबीमध्ये (कि.मी. १२/०० ते कि.मी. २०/५००) लहान पुलाच्या पुनर्बांधणीसह रस्त्याची सुधारणा करण्याचे काम मंजूर आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यात कांदा साठवणूकीची गोदामे वाढविण्याबाबत

**(२२) * ४१९९८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन होत असून कांदा साठवण्यासाठी पुरेशी गोदामे उपलब्ध नसल्याने कांद्याची आवक वाढते तेव्हा कांदयाचा दर कमी होत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होते व त्यानंतर टंचाई निर्माण होताच कांद्यांचे दर वाढतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात कांदा गोदामे वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही. राज्यात कांदा साठवणूकीसाठी गोदामे बांधण्यात येत नाहीत, तथापि शेतकऱ्यांना कांद्याच्या साठवणूकीसाठी कांदाचाळ उभारणीकरीता कृषी विभागामार्फत अर्थसहाय्य देण्यात येते. कृषी विभागाच्या योजनेंतर्गत सुमारे ९ लाख मे.टन कांदासाठवण क्षमता निर्माण करण्यात आली आहे. तथापि केवळ रबी हंगामातील कांद्याची दीर्घ कालावधीकरीता साठवणूक करणे शक्य आहे. पोस व रांगडा कांद्याची साठवणूक करणे शक्य नसल्याने बाजारपेठेतील तत्कालिन कांद्याच्या उत्पादन व पुरवठ्यानुसार दरांमध्ये बदल होतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्रांना निधी वितरण करण्याबाबत

**(२३) * ४१६६५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १२ बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यात आली असून सदर केंद्राना प्रतिवर्षी प्रत्येकी रुपये ५० लाख निधी वितरण करण्याबाबत सहायक अनुदान देण्याचा निर्णय शासनाच्या महसूल व वन (मदत व पुर्नवसन) विभागाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी शासन आदेश निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ ते २०१८-१९ या कालावधीत या १२ बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राना शासनाने किती निधी वितरीत केला आहे, मागील सात वर्षात उपलब्ध करण्यात आलेल्या निधीचे वितरण विनियोजन याबाबत या १२ बिगर प्रादेशिक आपत्ती केंद्राकडून शासनाने अमंलबजावणी अहवाल आणि विनियोजन अहवाल यांची माहिती घेतली आहे काय, या अहवालातुन कोणत्या बाबी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, मागील सात वर्षातील राज्यभरात आपत्ती व्यवस्थापनासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या अंदाजे रुपये ४२ कोटीच्या सहायक अनुदानापैकी खर्च करण्यात आलेल्या रकमेच्या तपशिलाची माहिती शासनाने घेतली आहे काय, त्याचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, राज्य शासनास केंद्र शासनाकडून किंवा केंद्र शासनाकडून थेट बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र यांना उपलब्ध झालेला निधी, वितरीत निधी, खर्चीत निधी, अखर्चित निधी, तसेच व्यपगत झालेला निधी यांची वस्तुस्थितीदर्शक माहिती काय आहे,

(४) असल्यास, बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राना आस्थापना, प्रशासन, कर्मचारी वर्ग तसेच माहिती अधिकारांतर्गत जनमाहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत राज्यातुन विचारणा करण्यात आलेल्या आणि शासनाने माहिती दिलेल्या माहिती अधिकार अर्जाचा तपशिल काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

एकूण १२ बिगर प्रादेशिक महानगरपालिकांपैकी फक्त ८ महानगरपालिकांनी त्याच्या क्षेत्राचा कृती आराखडा सादर केल्याने, या ८ महानगरपालिकांना फक्त सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात आपत्ती धोके निवारण कार्यक्रमांतर्गत प्रत्येकी रुपये ५० लाखांचा निधी विविध स्वतंत्र आदेशाव्दारे वितरीत करण्यात आला होता.

(२) मिरा-भाईंदर, उल्हासनगर, वसई-विरार, कोल्हापूर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, पिंपरी-चिंचवड, अहमदनगर या महानगरपालिकांना प्रत्येकी रुपये ५० लाख असा एकूण रुपये ४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर अनुदान अनावर्ती खर्चाकरीता व एक वेळेचे अनुदान म्हणून देण्यात आले आहे. आवर्ती खर्चासाठी संबंधित महापालिकेने तरतुद करणे अपेक्षित आहे. वितरीत निधी खर्चाची माहिती घेण्यात आली आहे. संबंधित महानगरपालिकांनी सदर निधी अंशत: खर्च केला असून एकूण खर्चित निधी रुपये २,३५,७०,५५०/- इतका असून अखर्चित निधी रुपये १,६४,२९,४५०/- इतका आहे.

(३) केंद्र शासनाकडून राज्य शासनास किंवा बिगर प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्रांना निधी उपलब्ध झालेला नाही.

(४) आवश्यक पदनिर्मिती आणि नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड शहरातील पुलांना संरक्षक कठडे बांधण्याबाबत

**(२४) * ४२६३० श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०७१ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहरात मोठा पुल, हिरालाल चौकाकडे जाणारा पुल, दगडी पुल या वर्दळीतील पुलांना संरक्षक कठडे नसल्यामुळे वारंवार अपघात होऊन जिवितहानी होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षापासुन बार्शी नाका येथील मुख्य पुल वाहतुकीस बंद असल्याने वरील तिन्ही पुलावरील वाहतुक प्रचंड वाढली असून संरक्षक कठडे नसल्याकारणाने अपघात रोखण्याच्यादृष्टीने उपरोक्त पुलांना संरक्षक कठडे बांधण्याबाबत नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीड शहरातील पुलांना संरक्षक कठडे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) केंद्र शासन रस्ते, वाहतूक व महामार्ग यांच्यावतीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत रा.म.क्र. २११ सोलापूर, धुळे या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम प्रगतीत असून हया प्रकल्पांतर्गत बीड शहरातील 'मोठा पूल' नाव असलेला हया महामार्गावर बिंदुसरा पूल असून त्याचे काम पूर्णत्वास आले असून संरक्षक कठडे पूर्णपणे बसविल्यानंतर सदर पूल वाहतूकीस दिनांक २० जुलै, २०१८ पर्यंत खुला करण्याचे नियोजन असून वळण रस्त्यावर तात्पुरता पूल करण्यात आला असून त्यावर गार्ड स्टोन असून मुख्य नवीन पुलावरुन वाहतूक सुरु केल्यानंतर तात्पुरता पूल पाडण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.

बीड नगर परिषद अधिनस्त हिरालाल चौकाकडे जाणाऱ्या पूलाचे कठडे तुटल्यामुळे सद्य:स्थितीत संरक्षक कठडे बसविण्याचे काम प्रगतीत असून जून, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच दगडी पूलावर तांत्रिक दृष्टया कठडे बसविणे उचित नसल्यामुळे त्याठिकाणी गार्ड स्टोन बसविण्याचे काम प्रगतीत असून दिनांक १५ जुलै, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील वाहनांची योग्यता तपासणी करण्याबाबत

**(२५) * ४२५६९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील वाहने सुस्थितीत रहावी, रस्ते अपघात प्रमाण कमी व्हावे जिवितहानी होऊ नये व पर्यावरण समृध्द रहावे यासाठी मोटार वाहन कायद्यानुसार दरवर्षी वाहनांची योग्यता तपासणी करणे अनिवार्य असतांनाही शहरातील १ लाख ९७ हजार वाहनांची योग्यता तपासणी करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वाहनांची योग्यता तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) दिनांक १९/०४/२०१८ रोजी दिव्य मराठी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांचे कार्यक्षेत्रातील परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तपासणीसाठी करोडी येथे ब्रेक तपासणी सुविधा उपलब्ध केली असून तेथे सीसीटिव्हीच्या निगराणीत वाहन तपासणी केली जाते.

जनतेसाठी योग्यता प्रमाणपत्र तपासणी संदर्भात ऑनलाईन अपॉईंटमेंट घेणे, फी भरणे यासारख्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता चालणाऱ्या वाहनांची कार्यालयाच्या अंमलबजावणी पथकाद्वारे तपासणी करुन दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाते.

जनतेस वर्तमानपत्राचे माध्यमातून योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांचेद्वारे करण्यात आले असून आवश्यकतेप्रमाणे सुट्टीच्या दिवशीही वाहन योग्यता प्रमाणपत्र तपासणी सुविधा कार्यरत ठेवण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दुसरबीड (जि.बुलढाणा) येथे शेत जमिनीच्या मुल्यांकनासाठी कृषी अधिकारी पदाचा गैरवापर करीत असल्याबाबत

**(२६) * ४१५३९ श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुसरबीड (जि.बुलढाणा) येथे समृध्दी महामार्गात गेलेल्या शेतजमिनीच्या मुल्यांकनासाठी कृषी अधिकारी लाच मागत असल्याने त्रस्त झालेले किनगाव राजा येथील शेतकरी नंदकिशोर माटे यांनी विषप्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे विनंती केल्यावरुन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास सूचना देऊन देखील संबंधित यंत्रणेने मूल्यांकन करुन जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात हेतूपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. श्री.नंदकिशोर माटे यांच्या शेत जमिनीवरील झाडाचे मुल्यांकनाबाबत दिनांक १० व ११ मार्च, २०१७ रोजी झालेल्या स्थळ पाहणी (पंचनामा) आणि त्यावेळी केलेल्या व्हिडीओ शुटिंगनुसार त्यांच्या शेत जमिनीवरील झाडांचे मुल्यांकन करण्यात आले आहे. सदर मुल्यांकनानुसार त्यांच्या शेतात ३ बोर व २ बिब्बा झाडे आढळून आली होती, त्यानुसार अनुक्रमे रूपये ७९७९.७५ व रुपये ५४९९.३९ मुल्यांकन निर्धारित करण्यात आलेले आहे. सदर मुल्यांकन अहवाल जिल्हा कृषी अधिकारी यांनी दिनांक १६/१०/२०१७ रोजी उपजिल्हाधिकारी तथा प्रशासक समृध्दी महामार्ग, बुलढाणा यांना सादर केला आहे. जिल्हास्तरीय मुल्यांकन

समितीने सदर मुल्यांकनास दिनांक ३०/१०/२०१७ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे श्री.माटे यांचे फळझाडाचे मुल्यांकन प्रलंबित नाही. श्री.माटे यांना सदर मुल्यांकन मान्य नसून ते १०० आंबा फळ झाडाचे मुल्यांकन करण्याची मागणी करीत आहेत तथापि, त्यांच्या शेताची स्थळ पाहणी (पंचनामा) व व्हिडीओ शुटिंग केली त्यावेळेस १०० आंबा झाडे प्रत्यक्षात शेतात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे १०० फळझाडाचे मुल्यांकन करण्यात आलेले नाही, असे श्री.माटे यांना अवगत करण्यात आले आहे. तरी देखील त्यांनी आपली मागणी मान्य व्हावी म्हणून विषप्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला परंतु प्रशासनाने प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सदर प्रसंग टाळला आहे.

(२) हे खरे नाही. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक ०८/०५/२०१८ च्या पत्रान्वये श्री.माटे यांच्या १०० फळझाडांचे मुल्यांकन करण्याच्या मागणीबाबतची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी बुलढाणा यांना कळविली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा मुख्यालयाच्या बांधकामाकरीता सिडकोला वाढीव रक्कम दिल्याबाबत

**(२७) * ४३०१० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याच्या नविन मुख्यालयासाठी रुपये ५०० कोटींचा खर्च अपेक्षित असताना शासनाने सिडकोला सदर कामासाठी सुमारे ४ हजार २०० कोटींची ३३७ हेक्टर जमीन आणि ६०० कोटी रुपयांची हमी असे सुमारे ४ हजार ८०० कोटी रुपये अदा केले असून ३ हजार ५०० कोटी रुपयांची वाढीव रक्कम दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसआरडीसी यांनी सिडकोला देण्यात आलेल्या २५ टक्के रकमेमध्ये मुख्यालय बांधण्याची तयारी दर्शविलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मुख्यालय बांधण्याच्या रकमेतील तफावतीमुळे सदर कामात अनियमितता झाल्याचे स्पष्ट होत असून शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

नवनिर्मित पालघर जिल्ह्याचे मुख्यालय व शहर विकसित करण्याच्यादृष्टीने पालघर परिसरात उपलब्ध ४०४-५७.९० हे.आर. शासकीय जमिनीचा विकास करण्याकामी सिडको लि. नवी मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून शासन निर्णय दिनांक २९/०६/२०१६ अन्वये उपलब्ध एकूण ४०४-५७.९० हे.आर. शासकीय जमिनीपैकी सुमारे १०३-५७.९० हे.आर. एवढी शासकीय जमीन विकसित करून त्यावर विविध विभागांच्या जिल्हास्तरीय कार्यालयांसाठी/निवासस्थानांसाठी शासकीय इमारतीचे बांधकाम करण्यास व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास तसेच उर्वरीत ३३७.०० हे.आर. एवढी शासकीय जमीन पालघर नवनगर म्हणून विकसित करण्यास आणि त्यावरील विकसित भूखंडांची विक्री विहीत कार्यपध्दतीनुसार करून भूखंड विक्रीद्वारे प्राप्त होणारा निधी नवीन जिल्हा मुख्यालय व पालघर नवनगर उभारण्यासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी उपयोगात आणण्यास शासनाकडून मंजूरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाचे सर्व हिशेब सिडको लि. यांना स्वतंत्रपणे ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून सदर प्रकल्पांतर्गत संपूर्ण विकसित भूखंड विक्री करून प्राप्त होणारा निधी या प्रकल्पावरील एकूण खर्चाच्या तुलनेत कमी पडल्यास सिडको लिमिटेडला तेवढ्या रकमेच्या भरपाईसाठी शासनाकडे निधीची मागणी करण्याची मुभा राहील असे आदेश देण्यात आले आहेत.

नवनिर्मित पालघर जिल्ह्याचे मुख्यालय व नवनगर विकसित करण्याकामी सिडको लि. नवी मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणेच किंचित बदलासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळानेही प्रस्ताव सादर केला होता. तथापि, पालघर नवीन जिल्हा मुख्यालय व शहराचा विकास नियोजनबध्द पध्दतीने व्हावा यादृष्टीने सिडको लि. यांना याकामी असलेला प्रदीर्घ अनुभव विचारात घेऊन शासनाने सिडको लि.च्या प्रस्तावास वरील प्रमाणे मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत

**(२८) * ४३०८८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३९११८ ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभाग व राज्य परिवहन महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांची अत्याधुनिक रुग्णालय तसेच त्यांच्या पाल्यासाठी ऑटोमोबाईल व मेकॅनिकल अभियंता महाविद्यालय उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यास व प्रत्यक्षात ते कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर महाविद्यालय किती कालावधीत कार्यान्वित होणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळामार्फत रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्यालय हे उपक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च व त्यापासून मिळणारे उत्पन्न याची व्यवहार्यता पडताळून आवश्यकतेनुसार

करावा लागणारा खर्च हा अपघात सहाय्यता निधीमधून उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक १५/११/२०१७ रोजी शासनाने मंजूरी दिली आहे.
(३) सद्य:स्थितीत, सदर प्रकल्प आखणीसाठी तज्ञ सल्लागार संस्थेच्या निवडीबाबतची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विभागीय व सांस्कृतिक क्रीडा स्पर्धेचा खर्च कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्याबाबत

**(२९) * ४३३२६ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण प्रदेश भूमि अभिलेखाच्या विभागीय क्रीडा व सांस्कृतिक विभागीय क्रीडा सांस्कृतिक स्पर्धा दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठांच्या प्रांगणात करण्यात आली असून त्याचा खर्च कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्याबाबत जिल्हा अधिकारी भूमि अभिलेख, रत्नागिरी यांनी उपअधीक्षक भूमि अभिलेख, रत्नागिरी, लांजा, राजापूर, संगमेश्वर, देवरुख, चिपळूण, गुहागर, खेड, दापोली, मंडणगड, नगरभूमापन अधिकारी, रत्नागिरी यांना दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास कर्मचाऱ्यांचे अभिप्रायासह अहवाल सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल शासनास सादर केला आहे काय, या अहवालाची छाननी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
दिनांक ०५/०१/२०१८ रोजी एका वर्तमानपत्रात “क्रीडा स्पर्धेसाठीचा खर्च कर्मचाऱ्याच्या खिशातून” या मथळ्याखालील बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानुषंगाने, सदरची बातमी रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व उपअधीक्षक भूमि

अभिलेख व नगरभूमापन अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्याबाबत त्यांचे अभिप्राय घेवून त्या आधारे स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, रत्नागिरी यांनी दिनांक ०९/०१/२०१८ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.

(२) याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला नाही. तथापि, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रत्नागिरी यांच्या सदर पत्रानुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख, संगमेश्वर, गुहागर, रत्नागिरी, चिपळूण, खेड व नगर भूमापन अधिकारी, रत्नागिरी यांचे अहवाल प्राप्त झाले असून, सदर बातमी वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी व खोटी असल्याचे अभिप्राय देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंतेश्वर (ता.लोहा, जि.नांदेड) येथील अवैध वाळूसाठ्याबाबत

**(३०) * ४३४४९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंतेश्वर (ता.लोहा, जि.नांदेड) येथे अवैधपणे वाळूचा उपसा करुन त्याची साठवणूक करीत असल्यामुळे तसेच सदर अवैध वाळूची वाहतुक अंतेश्वर येथील गावातून होत असल्याने त्याचा त्रास गावातील महिला व लहान मुलांना होत असल्याची तक्रार ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी यांना केली असल्याचे दिनांक ११/५/२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू साठे जप्त करुन अवैध वाळू उपसा बंद करण्याबाबत तसेच उक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे अंतेश्वर, ता.लोहा, जि.नांदेड येथे ३ महिन्यापासून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिनांक १०/४/२०१८ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, लोहा यांनी केलेल्या तपासणीमध्ये ३०५ ब्रास अनधिकृत वाळूसाठा जप्त करण्यात आला आहे. सदर वाळूसाठ्याच्या लिलावासाठी ७ फेऱ्या घेण्यात आल्या. तथापि, सदर वाळूसाठा लिलावात गेला नाही. अवैधपणे सदर वाळूसाठा करणाऱ्या संबंधित जमीन मालकांच्या मालमत्तेवर बोजा घेण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

सदर वाळूसाठा प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या तलाठी व मंडळ अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही तहसिलदार, लोहा यांचेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा लाभ देण्याबाबत

**(३१) * ४३५६६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या महिला कर्मचाऱ्यांना ९ महिने प्रसूती रजा देण्यात येईल असे परिपत्रक महामंडळाने दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी काढले असता यासंदर्भात लेखी आदेश नसल्याने वाहक महिला कर्मचाऱ्यांना आगार व्यवस्थापकाकडून रजा नाकारण्यात आल्यामुळे ४८ महिला वाहकांचे गर्भपात झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भवती महिला कर्मचाऱ्यांना बैठे काम देण्याच्या सूचना असतांनाही त्यांना वाहकाची ड्यूटी देण्यात आल्याबाबत महिला वाहक कर्मचाऱ्यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना ९ महिने प्रसूती रजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) महिला वाहक कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या ६ महिन्याच्या खास प्रसुती रजेसोबतच अतिरिक्त ३ महिन्याची प्रसूती रजा देय करण्याबाबत, त्याचबरोबर वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे महिला वाहकांच्या शैक्षणिक अर्हतेच्या अधिन राहून बैठे काम देण्याचा निर्णय विभागीय पातळीवर घेण्यात यावा व गरोदरपणाच्या कालावधीत काही ठराविक महिन्यांपर्यंत सुरक्षित, सुस्थितीत असलेल्या मार्गावर कामगिरी देण्याबाबत संबंधित आगार व्यवस्थापकांनी निर्णय घ्यावा त्याबाबतची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने जानेवारी, २०१८ पासून लागू करण्याबाबतच्या सूचना राज्य परिवहन महामंडळाच्या दिनांक २३/०३/२०१८ रोजीच्या परिपत्रकांन्वये प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात बोंडअळीमुळे नुकसानग्रस्त कापुस उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(३२) * ४३६८० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात कापूस पिकावर बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे १ लाख ४२ हजार ७३५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून नुकसान झालेल्या क्षेत्राच्या आकडेवारीचा अंतिम अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनाला पाठविला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोंडअळीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असल्यास नुकसानग्रस्तांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली आहे, तसेच बाधित झालेल्या जिरायत व बागायत क्षेत्रासाठी अपेक्षित असलेला रुपये १५७ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) बोंडअळीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले असून, दिनांक ८ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अहमदनगर जिल्हयासाठी रुपये १२५५९.२५ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रुपये ३३४९.०० इतका निधी वितरीत केला असून, क्षेत्रिय कार्यालयाकडून बाधित झालेल्या शेतकऱ्यांना रक्कमेचे संवितरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारसन आणि ठाणे न्हावे येथील भूखंडावर अनधिकृत गाळे बांधण्यात आल्याबाबत

**(३३) * ४३७१२ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारसन आणि ठाणे न्हावे येथील ९.५० हेक्टर भूखंडावर बांधकामास ग्रामपंचायतीची परवानगी नसतानाही काही गाळे बांधण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ विशेष नियोजन प्राधिकरण असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या परवानगीची आवश्यकता नाही. सारसन आणि ठाणे न्हावे येथील भूखंड महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने वाहनतळ व महामार्ग सुविधा विकसित करण्यासाठी भाडेपट्टयाने दिले आहेत. भूखंडाचा भाडेपट्टाधारकांना बांधकाम व विकास करण्याची परवानगी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इतर राज्यातून वाळू आयात करण्याबाबत

**(३४) * ४३७४५ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरित लवादाच्या निर्बंधामुळे तसेच, यंत्राचा वापर करुन वाळू उपसा करण्यास बंदी असल्यामुळे राज्यातील वाळू टंचाईवर मार्ग काढण्यासाठी शेजारील इतर देशातील समुद्री वाळू आयात करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मलेशियासह इतर तीन देशांनी वाळू उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत पुरवठादार राज्याना काही अटी व नियम घालून दिले आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) शेजारील इतर देशातील समुद्री वाळू आयात करण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना हमी भाव देण्याबाबत

**(३५) * ४१९५९ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधाच्या उत्पादन खर्चात वाढ आणि नफा घटल्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दुग्ध क्षेत्राला सुमारे रुपये २८०० कोटींचा तोटा सहन करावा लागत असल्याचे तर पुणे जिल्हा सहकारी दुध संघाने रुपये २२.४० प्रतिलिटर दूधाच्या दरात एक रुपयाने कपात केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुधाच्या खरेदी दरात ३ रुपयांनी वाढ करीत गाईच्या दुधाचा दर रुपये २४ वरुन रुपये २७ पर्यंत तर म्हशीच्या दुधाचा दर रुपये ३३ वरुन रुपये ३६ पर्यंत दरवाढ करण्याचा निर्णय शासनाने घेऊनही खाजगी व सहकारी संघाकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने निर्धारित केलेले दर न देता १८ ते २० रुपयांनी दर दिला जात असल्याने कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील विविध ठिकाणी दुध उत्पादकांनी दुध रस्त्यावर सांडून शासनाच्या विरोधात दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलने केले होते, तर दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय तसेच मान्य मागण्यांच्या अंमलबजावणीबाबत ठोस कृती झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जाहिर केलेल्या दरांनी दुधाला हमी भाव न देणाऱ्या दुध संघावर कारवाई करुन बरखास्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुध संघावर कारवाई करुन जाहिर केलेल्या दराप्रमाणे दुध उत्पादक शेतकऱ्यांना हमी भाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) राज्यात दुग्धव्यवसाय हा शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत केला जात आहे. यामध्ये शासनाचा सहभाग हा केवळ १% आहे. सहकार व खाजगी क्षेत्र त्यांच्यास्तरावर दुग्धव्यवसायाचे नियोजन करीत असतात. सन २०१७-१८ च्या दुधाच्या पुष्टकाळात नैसर्गिकरित्या दुधाच्या उत्पादनात वाढ झाली आहे. दुधाच्या उत्पादनातील वाढ व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूध भुकटीच्या घसरलेल्या दरामुळे दुग्ध क्षेत्राला तोटा सहन करावा लागला आहे हे खरे आहे.

तसेच, माहे एप्रिल, २०१८ मध्ये पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाकडून प्रतिलिटर रुपये २१.२० या दराने गाय दूध खरेदी केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) शासनाने निर्धारित केलेल्या दूध खरेदी दराप्रमाणे ज्या दूध संघांनी दूध उत्पादकांना दूध खरेदी दर दिलेले नाहीत, अशा सहकारी संघांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७९(अ)(३) अन्वये संबंधित विभागीय उपनिबंधक सहकार विभाग (दुग्ध) यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आलेल्या होत्या. तथापि, याप्रकरणी काही सहकारी दूध संघांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशान्वये या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती दिली आहे. सदर याचिका अंतिम न्यायनिर्णयार्थ प्रलंबित आहेत.

-----------------

## कळंभोण (ता.वसई, जि.पालघर) येथील खदाण मालकावर कारवाई करण्याबाबत

**(३६) * ४३२०३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंभोण (ता.वसई, जि.पालघर) येथील दगडखाण व्यवसायाकरीता परवानगी दिलेल्या खदाण मालकाने गैरवापर करुन राजरोसपणे भू-सुरुंग स्फोट केल्यामुळे तेथील आदिवासी नागरिकांच्या घरांना तडे गेल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खदाण मालकाने केलेल्या भू-सुरुंग स्फोटामुळे घरांना तडे जावून घरे कोसळण्याची स्थिती निर्माण झाली असून जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खदाण मालकाने मिळालेल्या परवानगीचा गैरवापर करुन तानसा नदीपात्रात देखील बेकायदेशीरपणे उत्खनन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दगडखाण व नदीपात्रातून बेकायदेशीर उत्खनन रोखून खदाण मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) कळंभोण (ता.वसई, जि.पालघर) येथील दगडखाण व्यावसायिकांनी केलेल्या भू-सुरुंगामुळे आदिवासी नागरिकांच्या घरांना तडे गेल्याची, घरे कोसळण्याची वा जिवितहानी होण्याचा धोका निर्माण झाल्याची तसेच खाणधारकाने तानसा नदीपात्रात बेकायदेशीरपणे उत्खनन केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यातील अवैध रेती व मुरुम उत्खनन रोखण्याबाबत

**(३७) * ४२१४० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यातील जोगीसाखरा परिसरात रस्ते बांधकाम सिमेंट कॉंक्रिट पूल व अन्य बांधकामांकरीता मोठ्या प्रमाणात रेती व मुरुमाचे अवैध उत्खनन करून त्याची वाहतुक करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध उत्खनन व वाहतूक महसूल विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने होत असून या अवैध उत्खनन व वाहतुकीमधून शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करुन अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागोठणे (जि.रायगड) येथील खाडीमार्गातून येणारे खारे पाणी रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३८) * ४१७१८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (जि.रायगड) येथील माचेला गावच्या स.नं. ९४ मधील नाल्यात जेएसडब्ल्यू कंपनीने पाईप टाकून पाणी पलिकडे येण्यासाठी तयार केलेल्या खाडीमार्गातून खारे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरत असल्याने शेतजमिनी नापिक होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी, रायगड व तहसिलदार, नागोठणे यांच्याकडे ११ गावातील नागरिकांनी वारंवार लेखी तक्रारी करुनही संबंधित कंपनीवर कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कंपनीवर कारवाई करीत नसल्याने ११ गावातील नागरिकांनी खाडीतील भरतीच्या पाण्यात आत्महत्या करणार असल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीवर कारवाई करुन खाडीतील खारे पाणी शेतकऱ्यांच्या जमिनीत येण्यापासून रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) नाही.

(४) ११ गावातील महिला व शेतकरी खाडीमध्ये बसून सत्याग्रह करणार असल्याबाबत दिनांक ०९/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी पेण, उपविभाग, पेण यांचे कार्यालयास लेखी कळविले आहे. सदरच्या पत्रात आत्महत्या करण्याबाबत नमुद केलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोडबंदर (जि.ठाणे) रोडवरील मोकळ्या भूखंड हस्तांतरणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३९) * ४३००५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) रोडवरील भाईंदरपाडा येथील मोकळ्या असलेल्या १० एकर भूखंडाचा नोंदणीकृत खरेदीखत झालेले नसताना बनावट कागदपत्रांच्या आधारे विकासकांच्या नावे हस्तांतरित करुन कोट्यवधी रुपयांचा टीडीआर घोटाळा झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९३ पासून सन २०१७ पर्यंत २४ वर्षे दुय्यम निबंधक ठाणे-१ यांचेकडे तीन दस्तऐवज नोंदणीसाठी प्रलंबित असताना, त्यांची नोंदणी झालेली नसतानाही तलाठी, मंडळ अधिकारी यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे फेरफार नोंद मंजूर करुन सदर भूखंड वल्लभ देठीया यांचे नावे केला व सदर भूखंडाची देठीया यांनी परस्पर विक्री केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीमध्ये फेरफार करण्याबाबत देढीया यांनी दिलेल्या अर्जावर दिनांक २७/३/१९९३ असताना तलाठी ओवळा यांनी १४ दिवस अगोदर म्हणजे दिनांक १६/८/१९९३ रोजी नोंदी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाचे निवेदन दिनांक ०७/०३/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे ओवळे, ता.जि.ठाणे फेरफार क्र. २२२९, २२३० व २२३१ पाहता सदर तीनही फेरफारांची नोंद दिनांक १६/०८/१९९३ रोजी घेतल्याचे व सदर नोंद दिनांक ०१/०९/१९९३ रोजी मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. सदर नोंदी वर्दी अर्जासोबतच्या सूची क्र. २ व खरेदी खताच्या साक्षांकित नकलेवरून (अनुक्रमे दस्त क्र. २६०२, २६०३ व २६०१) अधिकार अभिलेखात घेण्यात आल्याचे सदर नोंदीवरुन दिसून येते. सदर तीन्ही नोंदी मंडळ अधिकारी, ओवळे यांनी वर्दी अर्ज, नोटीस, सूची क्र. २ ची झेरॉक्स प्रत, इत्यादी कागदपत्रांच्या आधारे दिनांक १/९/१९९३ रोजी मंजूर केल्याचे दिसून येते. या फेरफारान्वये सदर मिळकतींच्या अधिकार अभिलेखात खरेदीदाराचे नावाची नोंद झाल्याचे दिसून येते. तद्नंतर वेळोवेळी उक्त मिळकतीपैकी आरक्षणाखालील काही भूखंड संबंधितांनी महापालिकेस नोंदणीकृत दस्ताने हस्तांतरीत केल्याने त्याबाबतच्या नोंदी अधिकार अभिलेखात घेण्यात आल्या असून आरक्षणाखालील जमिनी ठाणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्याने या जमिनीपोटी देय हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) महानगरपालिकेने संबंधितास अदा केलेला आहे.

दुय्यम निबंधक ठाणे क्र. १ यांच्या कार्यालयात दिनांक १३/०८/१९९३ रोजी नोंदणीस दाखल झालेल्या विक्रीखत दस्त क्र. २६०१, २६०२ व २६०३ पैकी विक्रीखत दस्त क्र. २६०१ या दस्ताची नोंदणी दिनांक २७/०८/१९९३ रोजी पूर्ण झाली असून विक्रीखत दस्त क्र. २६०२ व २६०३ या दस्तांची नोंदणी तत्कालीन दुय्यम निबंधक यांचे स्वाक्षरीकरीता अद्याप प्रलंबित असल्याचे दिसून येते.

तत्कालिन सहदुय्यम निबंधक ठाणे क्र. १ यांनी दिनांक १/०९/१९९३ रोजी उक्त तीन्ही दस्तांच्या सूची क्र. २ च्या नकला दिल्याचे दिसून येते. दस्त क्र. २६०२ व २६०३ हे दोन दस्त प्रलंबित असताना त्यांच्या प्रमाणित प्रती देण्यात आल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने याबाबत चौकशी करण्याचे निर्देश नोंदणी महनिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सह जिल्हा निबंधक वर्ग-१, ठाणे शहर यांना दिले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी घेण्यात आलेल्या फेरफारांमध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे अधिकार अभिलेखात फेरफार नोंदी घेण्यात आल्या व त्या प्रमाणित करण्यात आल्या त्या कागदपत्रांच्या बाबतीत प्रथमदर्शनी संदिग्धता दिसून येत असल्याने या तीनही फेरफार नोंदीची सखोल चौकशी करुन आवश्यकता वाटल्यास सदर तीन्ही फेरफारांचे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५७ अन्वये पुनर्रिक्षण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांना देण्यात आले आहेत. सदर पुनर्रिक्षणाच्या निष्कर्षाच्या आधारे संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## मुंबईतील मिठागरांच्या जमिनीवर घरबांधणी करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४०) * ४१४७९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने ज्या मिठागरांची जागा १००० पेक्षा जास्त आहे तीच जागा “पाणथळ जागा” समजावी अशी नवी व्याख्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मिठागरांचे क्षेत्रफळ ५४०० एकर असले तरी ते छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये असल्यामुळे व सलग १ हजार क्षेत्रफळाचे मिठागर नसल्यामुळे पाणथळ जागेचे संरक्षण मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागरांना भविष्यात मिळणार नसून मुंबईतील मिठागरांच्या जमिनीवर वाजवी दरातील घरबांधणी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्राच्या लाटांपासून मुंबईचे संरक्षण करणारी मिठागरे ही नैसर्गिक भिंती असून त्या नष्ट झाल्यास मुंबईसाठी धोका निर्माण होऊ शकतो याबाबत शासनाने सर्वेक्षण किंवा अभ्यास केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्वेक्षणाचे नेमके निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाने दिनांक २६/०९/२०१७ रोजी Wetlands (Conservation and Management) Rules २०१७ हे नियम राजपत्रात अधिसूचित केले असून त्यातील पाणथळ जमिनीच्या (wetland) व्याख्येनुसार मानवनिर्मित मिठागर पाणथळमध्ये समाविष्ट नाही.

शासनाने, शासन निर्णय क्रमांक जमीन २६१५/प्र.क्र.२५/ज-३, दिनांक २१/०८/२०१५ अन्वये "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास" मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागार जमिनींचा समुचित वापर करण्याच्या दृष्टीने बृहत आराखडा तयार करण्याकरीता नियुक्त केले आहे. त्यानुषंगाने पाणथळ जमिनींची नवीन व्याख्या विचारात घेवून मुंबईतील मिठागर जमिनीचा बृहत आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी येथे मत्स्यविज्ञान विद्यापीठ उभारण्याबाबत

**(४१) * ४१८६४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात ठाणे ते सिंधुदुर्ग दरम्यान मच्छीमार समाजातील मुलांना मत्स्यविज्ञान आधुनिक यंत्रसामुगी, समुद्रविज्ञान अभ्यास या विषयाचे शिक्षण घेण्यासाठी अशाप्रकारचे कोणतेही विद्यापीठ नसल्याने कोकणातील मच्छीमार समाजातील विद्यार्थ्यांना मत्स्यविज्ञानाचे शिक्षण घेण्यासाठी रत्नागिरी येथे कोकणासाठी स्वतंत्र मध्यवर्ती मत्स्यविज्ञान विद्यापीठ उभारावे, अशी मागणी अखिल भारतीय मच्छीमार गावीत समाज महासंघाने मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे एक वर्षापासून सातत्याने करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नागिरी येथे मस्त्यविज्ञान विद्यापीठ उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात रेती उत्खननास परवानगी देण्याबाबत

**(४२) * ४३१२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात वीटभट्टीचे शेकडो कारखाने असून माहे मार्च, २०१८ अखेर शासनाने रेती उत्खननाचे परवाने न दिल्याने रेती अभावी बांधकामे प्रलंबित असून त्यामुळे वीट उत्पादकांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने रेती उत्खनन करण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) सन २०१८-१९ करीता ठाणे जिल्ह्यात नदीपात्रातील रेतीगटांचे संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले असून शहापूर तालुक्यात मौजे काथोळे येथील चोर नदी व मौजे खरपत येथील शाई नदी असे दोन रेतीगट निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने खाणकाम आराखडा तयार करणे व पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही सुरु असून त्यानंतर लिलाव प्रक्रिया करण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील भूमिहीनांना जमिनी देण्याबाबत

**(४३) * ४३४६१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गोवळ खालचीवाडी व वरचीवाडी येथील वाझाराचे कांटे व अन्य ठिकाणची जागा भूमिहीनांना देण्याचे शासनाने निश्चित करून तद्नुषंगाने खोतांच्या ताब्यातील जमीन तहसिलदारांमार्फत ५४ भूमिहीनांना देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत उक्त ५४ भूमिहीनांपैकी २५ जणांचे नाव ७/१२ वरून रद्द करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू २५ भूमिहीनांची नावे ७/१२ वरुन रद्द करण्याची कारणे काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू २५ भूमिहीनांना जमीन विनाविलंब परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) श्री.पांडूरंग जनार्दन ठाकुरदेसाई, रा.गोवळ, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांनी महाराष्ट्र शेत जमीन (ज.धा.क.म.), अधिनियम, १९६१ अन्वये दाखल केलेल्या विवरणपत्रानुसार, त्यांनी धारण केलेल्या सर्व्हे नं. ५४/१८, ५८/३, ६५/१ ते ८, ७९/१ व ८३/२ या जमीन दिनांक २८/०३/१९७६ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांनी अतिरिक्त ठरविल्या होत्या. अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाचे दिनांक २८/०३/१९७६ रोजीचे आदेश अतिरिक्त आयुक्त, मुंबई विभाग यांनी पुनर्विलोकनामध्ये घेवून दिनांक १९/०४/१९७७ रोजीच्या आदेशान्वये सदरचे प्रकरण पुन्हा अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाकडे पाठविले. त्यानंतर दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांनी पूर्वी अतिरिक्त ठरविलेल्या सर्व्हे नं. ७९/१ व

६५/१ ते अतिरिक्त ठरवून उर्वरित सर्व्हे नं. मधील जमीनी मुळ मालकास परत करण्यात आल्या आहेत. अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांच्या दिनांक २८/०३/१९७६ च्या आदेशान्वये अतिरीक्त ठरविण्यात आलेल्या जमीनींचे वाटप फेरफार क्र. २४४८, दिनांक ३०/०४/१९७६ अन्वये करण्यात आले होते. परंतु सदर प्रकरणातील अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण, राजापूर यांचे दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये पुर्वी अतिरिक्त ठरविलेल्या जमिनीपैकी स.नं. ७९/१ व ६५/१ ते ८ याव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्र अतिरिक्त क्षेत्रातून वगळले असून फेरफार क्र. २४८२ अन्वये मुळ मालकास परत करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) जमिनीचे मुळ मालक श्री.पांडूरंग जनार्दन ठाकुरदेसाई यांनी धारण केलेल्या व अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाच्या दिनांक २८/०३/१९७६ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या जमिनीचे वाटप काही भूमिहिनांना फेरफार क्र. २४४८, दिनांक ३०/०४/१९७६ अन्वये करण्यात आले होते. तथापि, अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरणाच्या दिनांक १०/०४/१९७८ रोजीच्या आदेशान्वये जमीनधारकाचे अतिरिक्त क्षेत्र कमी झाल्याने काही भूमिहिनांना वाटप केलेल्या जमिनीचे वाटप रद्द झाले आहे व सदरचे क्षेत्र मुळ जमीनधारकास परत करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वाटप रद्द करण्यात आलेल्या भूमिहिनांना पुन्हा सदरचे क्षेत्र वाटप करता येणार नाही.

-----------------

## सोलापूर-बीड-धुळे राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(४४) * ४१७२७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-बीड-धुळे या राष्ट्रीय महामार्गावरील एडशी ते औरंगाबाद या टप्प्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असून महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत अस्तित्वातील रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असतानाही रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात संबंधिताकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नेमलेला स्वतंत्र अभियंता (I.E.) यांच्या संगनमतामुळे रस्त्यावर खड्डे पडून बीड जिल्ह्यात सन २०१४-२०१७ या चार वर्षात २४१३ मोटार अपघात झाले असून यामध्ये १२२५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नियम ९३ अन्वये दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी मा.मंत्री महोदयांनी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामाच्या गुणवत्तेबाबत नेमलेल्या स्वतंत्र अभियंत्याच्या कार्यपद्धतीची चौकशी करून महामार्गावरील खड्डे न बुजविणाऱ्या कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सोलापूर-बीड-धुळे (रा.म.क्र.२११) वरील एडशी ते औरंगाबाद या टप्प्याच्या चौपदरीकरणाचे काम प्रगतीत आहे. करारनामाच्या तरतुदीप्रमाणे संपूर्ण प्रकल्पाचे काम पूर्ण होईपर्यंत सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती कंत्राटदाराकडून आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(२) प्रश्नांकित महामार्गावर बीड जिल्ह्यात सन २०१४-२०१७ या कालावधीत एकूण ४६२ अपघात झालेले असून त्यामध्ये २३९ व्यक्ती मयत झालेले आहेत व ३६६ व्यक्ती जखमी झालेले आहेत असे पोलीस अधीक्षक, बीड यांनी कळविले आहे.
(३) उपरोक्त १ मध्ये नमुदनुसार देखभाल व दुरुस्ती संबंधित कंत्राटदाराकडुन होत असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वाळू उत्खननावरील बंदी उठविण्याबाबत

**(४५) * ४२८०२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलगुडवाडी करंज (ता.फलटण, जि.सातारा) येथील ओढ्यातून अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांना रोखले असता पोलिसांवर दगडफेक करून त्याच्या अंगावर रेतीने भरलेला ट्रक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वाळू उत्खननावर बंदी असल्याने अनेक जिल्ह्यात असे प्रकार घडत असल्यामुळे शासनाने वाळू आयात करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू आयात करणेबाबत किंवा वाळूवरील निर्बंध उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) अलगुडवाडी, ता.फलटण येथे अवैध वाळू उत्खनन रोखणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या सदर घटनेतील १४ व्यक्तींविरुध्द फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी सुधारीत वाळू निर्गती धोरण जारी करण्यात आले असून त्याआधारे नदीपात्रातील वाळूची निर्गती करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## कल्याण व अंबरनाथ (जि.ठाणे) येथील दस्त नोंदणी बंद ठेवल्याबाबत

**(४६) * ४१७९३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण आणि अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्याच्या ग्रामीण भागातील दस्त नोंदणी कोणत्याही शासकीय आदेशाविना गत दहा महिन्यांपासून बंद ठेवल्याने शासनास मिळणारा सुमारे ८१० कोटींचा महसूल थकल्याबाबतची तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्री.दुर्वास चव्हाण यांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद आणि विधानसभा व प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे दिनांक ५ मे, २०१८ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी स्वतंत्र एस.आय.टी. नेमून शासनाचा महसूल जाणीवपूर्वक थकविणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) याबाबतचे निवेदन दिनांक ०३ मे, २०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

अर्जदाराने निवेदनात नमूद केल्यानुसार कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील कुठल्याही प्रकारच्या दस्तांची नोंदणी बंद करण्याचे लेखी आदेश शासनाकडून देण्यात आलेले नाहीत. सह जिल्हा निबंधक ठाणे ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील अंबरनाथ तालुक्यातील सह दुय्यम निबंधक कार्यालय, उल्हासनगर क्र. ३ या नोंदणी कार्यालयात प्रश्नाधीन २७ गावांपैकी ८ गावांचे एकूण १५५४ दस्त वर्ष २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेले आहेत.

सह जिल्हा निबंधक ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील कल्याण तालुक्यातील सह दुय्यम निबंधक कल्याण क्र. १ ते ५ या नोंदणी कार्यालयात प्रश्नाधीन २७ गावांपैकी १९ गावांचे एकूण ७७३७ दस्त वर्ष २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेले आहेत.

यानुसार वर्ष २०१७-१८ मध्ये अंबरनाथ व कल्याण तालुक्यातील २७ गावांत एकूण नोंदणी दस्तसंख्या ९२९१ असून एकूण सुमारे रुपये १९२.१६ कोटी इतका महसूल मुद्रांक शुल्क व नोंदणी फी पोटी जमा झाला आहे.

त्यामुळे कल्याण आणि अंबरनाथ तालुक्याच्या ग्रामीण भागातील दस्त नोंदणी बंदीबाबत चौकशी करण्यासाठी स्वतंत्र एस.आय.टी. नेमून शासनाचा महसूल जाणीवपूर्वक थकविणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रसायनी (जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी विकास सामाजिक संस्थांच्या न्याय मागण्यांबाबत

**(४७) * ४१८१७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी विकास सामाजिक संस्थांनी आपल्या न्याय मागण्याच्या हक्कासाठी दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६० मध्ये भूसंपादित केलेल्या व प्रकल्पांसाठी न वापरल्या गेलेल्या जमिनीची विक्री करण्याच्या एकतर्फी निर्णयाच्या विरोधात शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मा.मुख्यमत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०४/२०१८ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत काय करता येईल याबाबत कायदेशीर बाबी तपासून शासनास अहवाल सादर करण्यासाठी विभागीय

आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे विभागीय आयुक्त यांनी समिती गठित केलेली आहे. समितीच्या अहवालानंतर पुढील उचित निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## पुणे शहरात दुचाकी वाहनांना नवीन ब्रेकप्रणाली बसविण्याबाबत

**(४८) * ४३७३४ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात दुचाकी वाहनांना नवीन ब्रेकप्रणाली बसविण्याचा आदेश राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने दिला असून सदर आदेशाच्या अंमलबजावणीबाबत वितरक आणि परिवहन अधिकाऱ्यांमध्येच संभ्रम निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुचाकी वाहनांच्या नव्या ब्रेक प्रणालीबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) सदर प्रकरणी दिनांक २८/०४/२०१८ रोजीच्या दैनिक लोकसत्ता वृत्तपत्रामध्ये अंमलबजावणीच्या संदर्भात बातमी प्रसिद्ध झाली होती.

केंद्र शासनाच्या दिनांक १६/०३/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ९६ मधील उप नियम (४) नंतर (४ए) नव्याने समाविष्ट केला आहे त्यानुसार दुचाकी वाहनांना ॲन्टीलॉक ब्रेकींग सिस्टीम किंवा संयुक्त (कंबाईंड) ब्रेकींग सिस्टीम बसविणे अनिवार्य केले असून त्याबाबत अंमलबजावणी करण्यासाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

याबाबत कोणताही संभ्रम निर्माण झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकण विभागातील कृषी सेवक पदाच्या नोकर भरती प्रक्रियेबाबत

**(४९) * ४३५८९ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१५२ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागाच्या ठाणे, पुणे, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, लातूर या ८ विभागात ९०५ कृषी सेवक पदासाठी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान परीक्षा घेण्यात आली असून कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यासाठी १७६ पदासाठी (पेसा क्षेत्र सोडून) परीक्षा घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यादीतील १७६ पदांसाठी कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून (पेसा क्षेत्र पदे सोडून) केवळ २० उमेदवारच कृषी सेवक पदी नियुक्त होऊ शकणार असून उर्वरित १६५ जागेवर अन्य जिल्ह्यातील उमेदवारांची भरती केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

कृषी विभागाच्या अखत्यारितील ८ विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयांच्या अधिनस्त कृषी सहाय्यक संवर्गातील पेसा क्षेत्रातील व पेसा क्षेत्राबाहेरील एकूण ९०८ रिक्त पदांसाठी दिनांक ०४/०२/२०१८ रोजी जाहिरात विज्ञापित करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये दिनांक १३ व १४ मार्च, २०१८ रोजी ऑनलाईन परीक्षा महापरीक्षा कक्ष, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांचेमार्फत घेण्यात आली होती. त्यामध्ये ठाणे विभागातील पेसा क्षेत्रातील ३४ व पेसा क्षेत्राबाहेरील १७६ रिक्त पदांचा समावेश आहे.

(२) व (३) करीता सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना दिनांक ९ जून, २०१४ नुसार पेसा क्षेत्रातील पदे केवळ स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरण्यात येतात. पेसा क्षेत्राबाहेरील १७६ उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. अशी अट आहे. त्यामुळे पेसा क्षेत्राबाहेरील पदासाठी महाराष्ट्रातील सर्व उमेदवार स्पर्धा करु शकतात.

प्रस्तुतच्या भरती प्रक्रियेची केवळ गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आलेली असून निवड यादी अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. प्रस्तुत प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे मूळ अर्ज क्र. ६२७/२०१८ दाखल केलेला असून सदर अर्जावर दिनांक ८/५/२०१८ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा.न्यायाधिकरणाने पुढील सुनावणीपर्यंत संपूर्ण भरती प्रक्रियेस स्थगिती दिलेली आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २५/७/२०१८ रोजी आहे. ही बाब लक्षात घेता सदर परिक्षेत कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून (पेसा क्षेत्र सोडून) केवळ २० उमेदवारच कृषी सेवक पदी नियुक्त होऊ शकणार असल्याचे तुर्तास सांगता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महसूली कामकाजावर लक्ष ठेवण्याकरीता स्वतंत्र यंत्रणा नेमण्याबाबत

**(५०) * ४३४०३ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र खासगी यंत्रणा नेमण्यात आली असून या यंत्रणेच्या माध्यमातून थेट पोलीस खात्यालाच ब्रिफिंग करण्याचे काम सोपविण्यात आल्याची माहिती मा.महसूल मंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाबाबत महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल विभागासह प्रत्येक शासकीय कार्यालयात नजर ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अनुलोम या संस्थेला अगोदरच नेमण्यात आले असल्याचे आरोप शासकिय कर्मचारी संघटनेकडून करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महसूल विभागातील रिक्त पदे, प्रामाणिक, गरीब व सरळमार्गी अधिकाऱ्यांना विदर्भ व मराठवाड्यात बदली व ठराविक अधिकारी यांना मुंबई, पुणे भागात बदली तसेच राज्यातील शेकडो पोलीस अधिकारी व पोलीस नदी व वाळू पट्ट्यात करित असलेल्या कामाची माहिती गुप्तहेरांकडून घेण्याबाबतची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) शासनाने अशा स्वरुपाची कोणतीही खाजगी यंत्रणा नेमलेली नाही.

(२), (३) व (४) अशी बाब आढळून आलेली नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबेजोगाई (जि.बीड) येथे आयोजित कृषी महोत्सवाची माहिती शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत

**(५१) * ४२५०७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई (जि.बीड) येथे माहे मार्च, २०१८ मध्ये भव्य जिल्हास्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आले असून, या कृषी महोत्सवाची माहिती कृषी अधिकारी व संयोजकांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली नसल्यामुळे महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजताचे चर्चासत्र दुपारी ४ पर्यंत सुरू करता आले नसल्यामुळे चर्चासत्र रद्द करावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषी महोत्सवात लाखो रुपये खर्च करुनही त्याचा शेतकऱ्यांना उपयोग झाला नसल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार दोषी अधिकारी व कर्मचारी यांची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. अंबेजोगाई (जि.बीड) येथे दिनांक १७ मार्च, २०१८ ते २१ मार्च, २०१८ या कालावधीमध्ये जिल्हास्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सदर कृषी महोत्सवाची माहिती सर्व उपलब्ध प्रचार व प्रसिद्धी या माध्यमांचा वापर करुन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यात आली होती. दिनांक १८ मार्च, २०१८ रोजी ऊसपीक या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. तथापि, त्यादिवशी गुढीपाढवा सण असल्यामुळे शेतकरी चर्चा सत्रास उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे सदर चर्चा सत्राचे आयोजन दिनांक २० मार्च, २०१८ रोजी करण्यात आले होते.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील मध्यवर्ती बस स्थानकाच्या जागी बसपोर्ट बांधण्याबाबत

**(५२) * ४३६५२ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५७० ला दिनांक १ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील मध्यवर्ती बस स्थानकाचे रुपांतर बसपोर्टमध्ये करण्याचा शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, सदर बसस्थानकाच्या जागी प्रस्तावित बसपोर्ट बांधण्यासाठी तीन वेळा निविदा मागविण्यात येवून त्यास प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे पुन्हा निविदा मागविण्याची प्रक्रिया केव्हा सुरू करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय.
(२) सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु त्यास प्रतिसाद प्राप्त न झाल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना सुधारित प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५३) * ४३४५१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील वाशी ते डोल्हारी, आंध्र, तेलंगणा, विदर्भाशी जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्याची कामे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाची केल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडून दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दुरवस्थेतील रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करावा लागत असल्याने जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत हिमायतनगर तालुक्यातील सर्व रस्ते सुस्थितीत असून वाहतुकीस योग्य आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरसीएफ स्थानिक मृदा परिक्षण प्रयोगशाळा अहमदनगरमध्ये कार्यरत ठेवण्याबाबत

**(५४) * ४३७२० डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाद्वारे सुरु असलेल्या राष्ट्रीय जमीन आरोग्य सुधारणा अभियानाचे (आरसीएफ) अहमदनगर जिल्ह्यातील केंद्राव्दारे माती परीक्षण प्रयोगशाळा तसेच मोबाईल व्हॅनद्वारे शेताच्या बांधावर माती परीक्षण सुविधांची माहिती १५ हजार शेतकऱ्यांना मोफत दिली जात असून सद्य:स्थितीत ही प्रयोगशाळा लातूरला स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरसीएफ केंद्र लातूरला जाणार असल्याने १५ हजार शेतकऱ्यांचे नुकसान होणार असून, खाजगी लॅबद्वारे माती परिक्षण सुविधा उपलब्ध असली तरी त्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक भार सोसावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरसीएफची अहमदनगर येथील माती परीक्षण प्रयोगशाळा बंद करण्याच्या विरोधात केंद्र शासनाच्या अहमदनगर मधील प्रतिनिधींकडे शेतकरी प्रयोगशाळा स्थलांतरित न करण्याची मागणी केली असून उक्त मागणी मान्य न झाल्यास आंदोलन करण्याची तयारी शेतकऱ्यांनी सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय जमीन आरोग्य सुधारणा अभियानाचे (आरसीएफ) केंद्र अहमदनगर मध्येच कार्यरत ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अहमदनगर येथील आरसीएफ स्थानिक मृदा परिक्षण प्रयोगशाळा लातूर येथील मृदा परिक्षण प्रयोगशाळेत विलिनीकरण करण्याबाबत निर्णय आरसीएफ व्यवस्थापनाने घेतलेला होता, हे खरे आहे.
(२) परंतु, आरसीएफ व्यवस्थापनाने सदर निर्णय स्थगित केलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही.
(३) आरसीएफ व्यवस्थापनाने निर्णय स्थगित केलेला असल्याने शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) अहमदनगर येथील आरसीएफ स्थानिक मृदा परिक्षण प्रयोगशाळा आहे त्याच ठिकाणी कार्यरत रहाणार असून माती परिक्षणाची सेवा नि:शुल्क (मोफत) पुरविली जाणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर-विजयपूर (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(५५) * ४१९६२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर-विजयपूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामात भूसंपादनाच्या कोणत्याही प्रक्रिया न राबविता रस्त्याच्या कामास सुरुवात केली असल्याने डिकसळ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे तक्रार केली असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादनाबाबत चौकशी करीत असताना ठेकेदाराकडून मंजूर नकाशाप्रमाणे कामे होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

डिकसळ (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांचे निवेदन कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, सोलापूर यांना प्राप्त झाले आहे. पंढरपूर-विजयपूर हा टेंभुर्णी-पंढरपूर-विजयपुर या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४१ए चा भाग असून सदर लांबीत (कि.मी.४०/८०० ते २५/१३६) चौपदरीकरणाचे काम नसुन पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे व ते मंजूर नकाशाप्रमाणे शासकीय हद्दीतच प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भातसा नदीपात्रातून (ता.शहापूर, जि.ठाणे) अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(५६) * ४३२०९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातसा नदीपात्रात (ता.शहापूर, जि.ठाणे) अवैध वाळू उपसा सुरु असल्यामुळे नदीकाठचा भाग खचत असून शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा रोखून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) भातसा नदीपात्रातून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत ग्रामस्थ मंडळ, पाषाणे, ता.शहापूर यांचा दिनांक ०५/०१/२०१८ रोजीचा तक्रार अर्ज तहसिलदार, शहापूर यांचेकडे प्राप्त झाला आहे. तसेच दिनांक ११/०५/२०१८ रोजी एका वृत्तपत्रात "भातसा नदीपात्रात वाळुमाफियांचा हैदोस, आदिवासींवर दबावतंत्राचा वापर" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली आहे.

सदर प्रकरणी संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी व स्थानिक पंच यांचेसमक्ष स्थळपाहणी केली असता भातसा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत

**(५७) * ४२८३६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी संपादित करावयाच्या मुंबई, ठाणे व पालघर या जिल्हयातील जमिनीसंबंधी पर्यावरणीय परिणामांबाबत माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीसाठी पर्यावरण मसुदा संबंधिताना सुलभतेने उपलब्ध झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण मसुद्याअभावी या क्षेत्रातील जाणकार व सामान्य नागरीकांना आपल्या हरकती व सूचना नोंदविण्यात अडचणी निर्माण झाल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वसामान्यांना पर्यावरण मसुदा सुलभतेने उपलब्ध करुन द्यावा व मुंबई, ठाणे व पालघर या जिल्ह्यात स्वतंत्रपणे सुनावणी आयोजित करण्यासाठी राज्य शासनाने नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई-अहमदाबाद द्रुतगती बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाकरीता दीड लाख खारफुटीच्या रोपांची कत्तल होणार असल्याने त्यांचे पुनर्रोपण कुठे व कसे करावे याबाबत रेल्वे मंडळाने आराखडा तयार केला आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) नाही.

पर्यावरण परिणाम मुल्यांकन अहवाल (EIA) यापुर्वीच राष्ट्रीय जलदगती रेल्वे महामंडळ लि. मुंबई यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

तसेच राष्ट्रीय जलदगती रेल्वे महामंडळ लि. मुंबई यांनी पुरवणी पर्यावरण परिणाम मुल्यांकन अहवाल (EIA) जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (JICA) यांना जून, २०१८ मध्ये मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

(४) व (५) खारफुटीच्या एकंदरीत कत्तलींबाबत वन विभागाकडून कत्तल होणाऱ्या खारफुटीची मोजणी अद्याप करण्यात आलेली नाही. तथापि, यादरम्यान सदर खारफुटीतल्या नुकसानीबाबतचा अहवाल वन विभागाने राष्ट्रीय जलदगती रेल्वे महामंडळ लि. मुंबई यांच्याकडे सादर केल्यानंतर त्याबाबतची नुकसान भरपाई महामंडळातर्फे देण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवर पुल बांधण्याबाबत

**(५८) * ४२७१३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील मुख्य राज्यमार्ग ते बौध्दवाडी, कदमवाडी, बागवाडी व खाडयेवाडी यांना जोडणाऱ्या अर्जुना नदीवर पूल बांधण्यात यावा म्हणून रायपाटण ग्रामपंचायतीने मागील ९ वर्षापासून सातत्याने तसेच ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी मागील अनेक वर्षापासून मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, राजापूर व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी आदीकडे लेखी निवेदनाद्वारे आंदोलन व उपोषण करून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायपाटण गावातील अर्जुना नदीवरील पुलाचे काम पूर्ण करुन पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) या पुलाचा प्रस्ताव शासनाने नाबार्डकडे मंजूरीसाठी पाठविला आहे.

-----------------

## मुमरी (ता.शहापूर, जि.ठाणे) धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५९) * ४३१३१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुमरी (ता.शहापूर, जि.ठाणे) धरणग्रस्तांचे पुनर्वसन व जागेचा मोबदला न देता धरणाचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धरणग्रस्तांचे पुनर्वसन करुन संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

मुमरी धरणाच्या बुडीत क्षेत्रासाठी १३३.१६१ हे. खाजगी जमिनीची आवश्यकता असून १३३.०६१ हे.पैकी १७.५०७ हे. जमीन संपादित करण्यात आली असून, त्याचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे. पुनर्वसन गावठाणासाठी २.९६ हे. जमीन साजिवली गावात आरक्षित केली होती. परंतु प्रकल्पग्रस्तांना साजिवली येथील जागा पुनर्वसनासाठी पसंत नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी मौजे खैरे, ता.शहापुर येथील जमीन मिळणेबाबत सुचविले आहे. प्रकल्पग्रस्तांनी पसंत केलेल्या जमिनीची खाजगी वाटाघाटीव्दारे खरेदी करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकऱ्याला जमिनीचा सातबारा उतारा मिळणेबाबत

**(६०) * ४१७२९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८५१ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गंगावाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकरी श्री.मदन रामभाऊ यादव यांची राहेरी तलाठी सज्जातील गट नं. ३१५ चे पान मूळ महसूली अभिलेख्यातून गहाळ झाल्यामुळे त्यांना त्यांच्या जमिनीचा सातबारा उतारा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तारांकित प्रश्न क्र. ३७८५१ ला दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी मा.महसूल मंत्री यांनी दिलेल्या उत्तरात संबंधित शेतकऱ्यावर अन्याय झाल्याचे मान्य करून दोन महिन्यात हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित शेतकऱ्याचे प्रत्यक्ष ताबा क्षेत्र आणि नव्याने तयार होणाऱ्या सातबारा वरील क्षेत्र यामध्ये विसंगती निर्माण झाल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा सातबारा उतारा मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मा.मंत्री (महसूल) यांनी सदर प्रश्नास दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. मौ.गंगावाडी येथील सर्वे नं. १२४ व १२५ गट नं. ३१५, ३२१, ३३५ चे जायमोक्यावर अर्जदार यांचा दिनांक ११/०४/२०१८ रोजी जबाब नोंदवून पंचनामा करण्यात आला. स्थळ पाहणीमध्ये संबंधित अर्जदार हे सर्वे नं. १२४, गट नं. ३३५ चे सरकारी क्षेत्रामध्ये वहिती करत असल्याचे दिसून आल्याने अर्जदार यांना समक्ष समज देण्यात आली आहे व त्याप्रमाणे, अर्जदार यांना दिनांक १९/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सातबारा तयार करता येत नसल्याचे कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगरुण व मांडवी (ता.हवेली, जि.पुणे) या गावाकरीता नेमून दिलेले तलाठी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याबाबत

**(६१) * ४३३०१ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगरुण व मांडवी (ता.हवेली, जि.पुणे) या दोन गावासाठी गत २ वर्षापासून एकाच तलाठ्याची शासनाने नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाठी सांगरुण व मांडवी या गावी नियमित उपस्थित राहत नसून आपल्या सोईनुसार उपस्थित राहत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलाठ्याच्या अनुपस्थितीमुळे सांगरुण गावातील ग्रामस्थांना शेतीविषयक कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असल्याच्या तक्रारी गावातील ग्रामस्थांनी तहसिलदार, हवेली, प्रांताधिकारी तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मौखिक व लेखी स्वरुपात करुनही संबंधित तलाठ्याविरुध्द कारवाई झाली नसल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तलाठ्याविरुध्द कारवाई करुन तलाठ्यास नेमून दिलेल्या गावी नियमित उपस्थित राहण्यास समज देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) ता.हवेली तहसिलमध्ये एकुण ४६ तलाठी सजे असून त्यापैकी ४२ सजास नियमित तलाठी आहेत व उर्वरित ४ सजे रिक्त असल्याने त्याचा अतिरिक्त कार्यभार इतर कार्यरत तलाठ्यांना देण्यात आला आहे. त्यापैकीच सांगरुण हे १ सजा असून त्यामध्ये मांडवी बु., मांडवी खु., बहुली व भगतवाडी ही गावे समाविष्ट आहेत.

तहसिलदार हवेली यांच्या दिनांक १५/०३/२०१८ च्या आदेशान्वये “ई-फेरफार” कामकाजासाठी सर्व तलाठी हे सोमवार व गुरुवार वगळता उपविभागीय कार्यालयात स्थापन केलेल्या गा.न.नं. ७/१२ संगणकीकरण कक्षामध्ये हजर राहत असतात. या कारणास्तव तसेच ग्रामपंचायत निवडणुक व इतर प्रशासकीय कारणास्तव तलाठी सांगरुण सजेचा कार्यभार हाताळणारे तलाठी सदर सजास हजर राहु शकले नाहीत.

सदर सांगरुण सजेच्याबाबतीत तलाठी सजेस हजर राहत नसल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्याने संबंधित तलाठ्यास सुनावणी नोटीसा देवुन खुलासा घेण्यात आला आहे. त्यानुसार तलाठी सांगरुण सजा यांनी समाधानकारक खुलास न दिल्याने त्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

यांच्या दिनांक २६/०६/२०१८ च्या आदेशान्वये दोन वेतनवाढी रोखण्याबाबत शिक्षा देण्यात आली असून प्रत्येक सोमवारी सांगरुण सजाचे ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचनाही देण्यात आले आहेत.

-----------------

## शिळफाटा ते भिवंडी (जि.ठाणे) महामार्गाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(६२) * ४३७६२ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या शिळफाटा ते भिवंडी (जि.ठाणे) महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुपये ३९० कोटी खर्चाच्या या एकूण प्रकल्पापैकी सदर रस्ता चौपदरी वरून तो सहापदरी करण्याच्या कामाचे रुपये १९५ कोटी २० लाखांचे कंत्राटाचे कार्यादेश माहे जानेवारी, २०१८ मध्ये दिलेले असतानाही या कामास प्रत्यक्षात सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर सहापदरी रस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) या कामातील लोढा-पलावा येथील उड्डाणपुल, देसाई येथील खाडीवरील पूल व पाईप मोऱ्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. तसेच रस्त्याचे काम पावसाळ्यानंतर हाती घेण्यात येईल.
(३) या प्रकल्पासंबंधित सी.आर.झेड. वृक्षतोडबाबतच्या परवानग्या व भूसंपादन याबाबी अंतिम करुन पावसाळ्यानंतर रस्त्याचे काम हाती घेण्यात येईल. या कामातील लोढा-पलावा येथील उड्डाणपुल, देसाई येथील खाडीवरील पूल व पाईप मोऱ्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यात पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(६३) * ४१८१४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील विविध भागातील नद्या कोरड्या पडल्याने माणसांसह पशुपक्षांची पाण्याअभावी गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमर्याद खाण प्रकल्प, अमाप वाळू उपसा, बेसुमार वृक्षतोड यामुळे कोकणात कमी होत असलेल्या पावसामुळे नद्या गाळाने भरल्या असून, डोंगर खचले आहेत, मातीची धुप वाढली आहे, त्यामुळे नद्यांचे परिवर्तन मैदानात झाले असल्याने पाण्याअभावी माणसांसह पशुपक्षांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) संगमेश्वर तालुक्यात उन्हाळ्यामध्ये एप्रिल व मे महिन्यात काही भागातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे स्त्रोत कमी अथवा आटत असल्याने काही भागातून पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणाऱ्या भागाला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. संगमनेर तालुक्यातील टंचाईग्रस्त १८ गावातील ३६ वाड्यांना चालू वर्षात पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील गावांना दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(६४) * ४३५९२ श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दासगाव, जुई, रोहण, कोंडिवले (ता.महाड, जि.रायगड) या गावात माहे जुलै, २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून शंभरहून अधिक जण दगावल्याच्या घटनेला १३ वर्षे होवूनही रायगड जिल्हयातील १०३ गावामध्ये दरड कोसळण्याची परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ च्या पावसाळापूर्व जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाने केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार महाड तालुक्यातील ४९ गावांवर दरड कोसळण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून लोअर तुडील, टोळ खुर्द बौध्दवाडी, मोरेवाडी शिंगरकोंड, पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक आणि कोंडिवते ही पाच गावे अतिधोकादायक अवस्थेत असल्याचा अहवाल देण्यात आलेला असून येथील रहिवाश्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरण करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयातील कोणत्या तालुक्यातील किती गावांमध्ये दरड कोसळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खबरदारीचा उपाय म्हणून दरडग्रस्त गावांमधील ग्रामस्थांच्या संरक्षणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

भारतीय भुवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने रायगड जिल्हयातील गावांची भूवैज्ञानिक मानकांच्या आधारे दरड कोसळण्याच्या प्रवणतेनुसार (vulnerableility) वर्ग- I, II, III अशी वर्गवारी केली आहे. त्यानुसार महाड तालुक्यातील वर्ग I मध्ये लोअर तुडील, टोळ खुर्द बौध्दवाडी, मोरेवाडी

शिंगरकोंड, पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक आणि कोंडिवले ही पाच गावे अतिउच्च संभाव्य दरड प्रवण असल्याचा अहवाल देण्यात आलेला आहे. या गावांची अतिउच्च वर्गवारीतील संभाव्य दरडप्रवणता विचारात घेता, पावसाळयाच्या कालावधीत जागरुक राहण्याचा सल्ला अहवालात देण्यात आलेला आहे. त्यामुळे अतिवृष्टी होत असल्यास नागरिकांना वेळीच सुरक्षित स्थळी तात्पुरते स्थलांतर करण्याच्या सूचना जिल्हास्तरावरुन देण्यात येत असून त्यांच्या निवासाकरीता पर्यायी व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे दरडप्रवणतेच्या वर्गवारीप्रमाणे संभाव्य दरडप्रवण गावात विविध रचनात्मक व अरचनात्मक उपाययोजना राबविण्यास शिफारस केलेली आहे.

(३) भारतीय भुवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील ४९ गावे, पोलादपूर तालुक्यातील १५ गावे, रोहा तालुक्यातील १३ गावे, म्हसळा तालुक्यातील ६ गावे, माणगाव तालुक्यातील ५ गावे, पनवेल, खालापूर, कर्जत, सुधागड तालुक्यातील प्रत्येकी ३ गावे, श्रीवर्धन तालुक्यातील २ गावे, तहा तालुक्यातील १ गाव अशा एकुण १०३ गावांचा संभाव्य दरडग्रस्त म्हणुन समावेश आहे.

(४) भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने त्यांच्या अहवालात रायगड जिल्हयातील २० गावे (वर्ग १ ची ९ वर्ग २ ची ११) अतिउच्च संभाव्य दरडप्रवण व इतर ८३ गावांमधील दरडप्रवणतेविरुध्द करावयाच्या कार्यवाहीसंबंधात अरचनात्मक व रचनात्मक उपाययोजना करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी रायगड यांनी त्यांच्या दिनांक ३१/०३/१८ च्या पत्रान्वये अहवालातील नमूद शिफारशींनुसार उचित कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिषद अलिबाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (अलिबाग, महाड व पनेवल), नगर रचना विभाग रायगड-अलिबाग, सर्व उपविभागीय अधिकारी, मुख्य अधिकारी नगरपरिषद सर्व, अप्पर जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा खनिकर्म अधिकारी रायगड-अलिबाग यांना कळविलेले आहे. दिनांक १७/०५/१८ ते २१/०५/१८ या कालावधीमध्ये तालुकास्तरावर दरडप्रवण गावातील सरपंच, पोलीस पाटील, तलाठी, प्रतिष्ठीत नागरीक, ग्रामसेवक यांच्या उपस्थितीमध्ये जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातुन दरड कोसळण्याबाबत

सविस्तर माहिती प्रसारित करण्यात आली आहे. पाऊस मोजण्यासाठी प्रत्येक महसूल मंडळावर पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात आले असून अतिवृष्टी होत असल्यास नागरिकांना वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. रचनात्मक शिफारशींमध्ये

१. दरडप्रवण गावांमधील डोंगर उताराकडील बाजूस डोंगर कापण्याच्या कामास प्रतिबंध करणे.
२. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी पाणी वाहुन नेण्याची व्यवस्था निर्माण करणे.
३. खंदक उभारणी करणे.
४. पावसाळी हंगामामध्ये जमिनीस पडणाऱ्या भेगा, अस्थिर भूभाग यासारख्या भुर्गभ हालचालींवर लक्ष ठेवुन जनजागृती करणे.
५. डोंगरउतारावरील मोठे दगड हटविणे.
६. डोंगरातील दरडप्रवण भागातील नागरिकांचे कायमस्वरुपी स्थलांतर करणे, या उपाय योजनांचा समावेश आहे. तांत्रिक अहवालातील संभाव्य दरडप्रवणतेच्या गावांची वर्गवारी व तिव्रता विचारात घेवून योग्य त्या उपाययोजना राबविण्याची दक्षता स्थानिक प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग व मालवण समुद्रात परराज्यातील मच्छिमार नौकामुळे स्थानिक मच्छिमार धोक्यात आल्याबाबत

**(६५) * ४३४०४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२४५ ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण समुद्रात मासेमारी करण्यासाठी टाकलेल्या जाळ्यांचे परराज्यातील हायस्पीड नौकांनी अतिक्रमण करुन स्थानिक मच्छिमारांचे नुकसान करीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग येथील समुद्रात घुसखोरी करुन बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या नौकांविरोधात स्थानिक मच्छिमारांनी हल्लाबोल आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्यांवर प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने स्थानिक मासेमारी धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग व मालवण समुद्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या परराज्यातील नौकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सिंधुदुर्ग व मालवण समुद्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.